साळअखेर " ७ " ८
किरकोळ अंकास ....................४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .......०।

Six monthly............5 6 as.
Single copy............................4 as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3a

THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 6 NOVEMBER 1893 NO 44

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ६ माहे नवंबर सन १८९३ इ० अंक ४४

नोटीस

किरकोळ दि० मु० नं० ३ सन१८९३
वि० दिपुटी कमिशनर साहेब बहादूर
जि० उमरावती यांचे कोर्टांत.

मैनाबाई नवरे हारलाल पागसुक
जात परवार राहणार उमरावती. } मेत.

ज्या अर्थी ओंकारदास वल्लद लालचंद व फत्तेचंद वाला लालचंद राहणार आकोट यांनी ह्या कोर्टास सदरहू मैताचे इस्टेटीबद्दल व मालमिळकती बद्दल सन१८४१चा अक्ट नं. १९ अन्वयें अर्ज दिल्या वरून सदरहू मैताचे जे वारस व ज्यांचा विशेष संबंध आहे असे लोकांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या तारखे पासून एक महिन्याचे आंत जे कोणी त्या इस्टेटीचे संबंधानें वारस असतील त्यांनीं आपला हक्क संबंध दाखविण्या करितां मे० निकालीट साहेब बहादूर जि० ज्यडज्य कोर्ट उमरावती यांचे कोर्टांत हजर व्हावें.

कोर्टाचे सही शिक्यानिशी ही नोटीस दिली असे. आज तारीख १४ माहे आक्टंबर सन १८९३ इ०

W. V. Chandekar.
Clerk of Court

## विजया दशमीचें सोनें

THE OUT—LAW

O, Brignall banks are wild and fair,
And Greta woods are green,
And you may gather garlands there
Would grace a summer-queen.

And as I rode by Dalton-Hall
Beneath the turrets high,
A Maiden on the castle-wall
Was singing merrily:
'O, Brignall banks are fresh and fair,
And Greta woods are green;
I'd rather rove with Edmund there
Than reign our English queen.'

'If, Maiden, thou wouldst wend with me,
To leave both tower and town,
Thou first must guess what life lead we
That dwell by dale and down.
And if thou canst that riddle read,
As read full well you may,
Then to the greenwood shalt thou speed
As blithe as Queen of May.'
Yet sung she 'Brignall banks are fair,
And Greta woods are green;
I'd rather rove with Edmund there
Than reign our English queen.

'I read you by your bugle-horn
And by your palfrey good,
I read you for a ranger sworn
To keep the king's greenwood.'
'A Ranger, lady, winds his horn,
And 'tis at peep of light,
His blast is heard at merry morn,
And mine at dead of night.'
Yet sung she 'Brignall banks are fair,
And Greta woods are gay;
I would I were with Edmund there
To reign his Queen of May!
'With burnish'd brand and musketoon
So gallantly you come,
I read you for a bold Dragoon,
That lists the tuck of drum.'
'I list no more the tuck of drum,
No more the trumpet hear;
But when the beetle sounds his hum
My comrades take the spear.
And O! though Brignall banks be fair,
And Greta woods be gay,
Yet mickle must the maiden dare
Would reign my Queen of May!
'Maiden! a nameless life I lead,
A nameless death I'll die!
The fiend whose lantern lights the mead
Were better mate than I!
And when I'm with my comrades met
Beneath the greenwood bough
What once we were we all forget,
Nor think what we are now.'

*Chorus.*

Yet Brignall banks are fresh and fair,
And Greta woods are green,
And you may gather garlands there
Would grace a summer-queen.

Sir. W. Scott.

'नर्मदा तटीं बहु नीर सरस वानीर आम्र अंजीर तरूंची दाटी।
'बहुगर्द जुईची दाटी ॥ १ ॥'
'वाटेते रमण संगती कुसुमफळतती वहावी रति पातीसि वनिं भावें।
'तारुण्य सौख्य सेवावें ॥२॥' ॥ ध्रु ॥
'फिरतसे जर्यी मी पुरीं — उपरी कान्तरीं गीत सुंदरी मधुर आलापी !'
बहुतृष कुला जणु वापी'
'नर्मदा तटी ०'
'टाकुनी पुरी नर जुनी मनसेवें वनीं येसि कामिनी विचार करी मानिचा।
पाहोनि नित्य क्रम आमुचा ॥'
'सोडवी सखे हें कूट प्रथम तूं नीट करूं सुखलूट वनीं मग हर्षे।
घालवूं सुखें बहु वर्षे ॥'
'गातसे सखी गंभीर तरिही ' वानीर आम्र अंजीर तरूंची दाटी।
बहुगर्द जुईची ताटी ॥
वाटेंत अमरपति सती पदीं नच रती दयित संगतीं इयें दिन जावें।
तारुण्य सौख्य सेवावें ॥'
'ओळखें तुह्मां मी आनि चांगला वानि घोर आवाजिं शृंग नव हस्ती।
नृप किंकर वनिची वस्ती ॥'
'सुंदरी नृपाचा दूत शृंग साकूत वाजवी दूत-अरुण जयिं वरती।
आमुचें स्फुरे गे रातीं ॥'
गातसे सखी गंभीर तरी हि ' वानीर ०'
'ओळखें तुह्मां-करवाळ करीं-जिरवाळ रणीं अरिजाळ दुंदुभी हासें।
नृप शिलेदार तुह्मी खासे ॥'
दुंदुभी मला नच ठावि-तुतारि पावि रजन्या रावें सखे वच घेती।
मान्मित्र कुंतला हातीं ॥
नर्मदां खर बहुनीर खरी वानीर आम्र अंजीर तरूंची दाटी।
बहु गर्द खरी फुक ताटी ॥
लागते अमुप सुंदरी धैर्य अंतरीं तिजसिनोवरी वरी जे मनला।
मनसेवें वनीं विचारण्याला ॥'
'आमुचें वनींचें कर्म' 'कसा यम धर्म आह्मां जे' 'वर्म न हें सखी वदणें।
मनपारिस निशाटची वरणें ॥
जातसे सुहृत्संगतीं जर्यी, विस्मृति निखिल मागुती घडे सख्ये ही।
तत्काळ स्मृती ही जाई ॥'
नर्मदा तटी'•

THE RAINY DAY.

The day is cold, and dark, and dreary;
It rains, and the wind is never weary;
The vine still clings to the mouldering wall,
But at every gust the dead leaves fall,
And the day is dark and dreary.

My life is cold, and dark, and dreary;
It rains and the wind is never weary;
My thoughts still cling to the mouldering past,
But the hopes of youth fall thick in the blast,
And the days are dark and dreary.

Be still sad heart! and cease repining;
Behind the cloud is the sun still shining;
Thy fate is the common fate of all,
Into each life some rain must fall,
Some days must be dark and dreary.

Longfellow.

आर्या

अंबरीं धुंद दिशा; शीत कडाडे; भयाण जग सारें,।
पाऊस पडे झिम झिम, झोंबे अंगास सारखें वारें; ॥१॥
द्राक्ष लता भिंतीला पडक्या अद्यापि चिकटुनी राहे;
परशुष्क पर्ण गळती वाऱ्यानें :- बहु उदास दिन आहे ॥ २ ॥
अज्ञानांध :कारीं जीवित निःस्नेह मम उदास असें; ।
चिंता तुफान माजे; व्यसन शतें क्लिन्न हृदय हें ही तसें; ॥ ३॥
गत काळा चिकटुनिया अद्यापी मद्विचार हे वसती; ।
तारुण्याशा भग्नचि चिंतापवनें.:— उदास दिन असती.॥ ४ ॥
हो स्वस्थ खिन्न हृदया! व्यर्थ नको काळजी— परा ज्योती।
व्यसन ढगाच्या मागें झळके अद्यापि कासया भीति ॥ ५ ॥
त्वत्सम इतर नरीं वा! दैवाचा दुर्विपाक हा पाहे।
व्यसन शत ग्रस्तनरा जाती येथें उदास दिन कांहीं ॥ ६ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य १३ शके १८१५

यंदा राष्ट्रीय सभेची वार्षिक बैठक पंजाबांत भरणार आहे आणि तिजबद्दल त्या इलाख्यांत कडेकोट तयारी चालली आहे हें कळविण्यास मोठा संतोष वाटतो. लाहोरच्या बैठकीस लागणारा खर्च भागविण्यास उत्तर हिंदुस्थानांतील वर्गण्यांचे फंड पुरे आहेत. पण राष्ट्रीय सभेच्या चिरस्थायी फंडांत कांहीं शिल्लक नाहीं, विलायतच्या ब्रिटिश कांग्रेस कमिटी कडून पैशाबद्दल मागण्या वर मागण्या येत आहेत, 'इंडिया' पत्र चालविण्याचा खर्च अद्याप भागत नाहीं, आणि पुढें जीं कार्ये व्हावयाचीं आहेत तीं द्रव्यबळानेंच सफल होणार आहेत तेव्हां या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन देशाभिमानी राजभक्तांनीं हस्तें परहस्तें वर्गण्या गोळा केल्या पाहिजेत. इतकीं वर्षे जी संस्था चालविली तिचीं सोन्या सारखीं फळें न गमावण्या साठीं निदान सर्व राष्ट्रवाल्यांनीं पैसे दिलेच पाहिजेत. ही गोष्ट वेळेवर झाली तर ठीक. आणि ती वेळ हीच आहे. उदारपणा, देशभक्ति, व कार्य कर्तृत्व हीं कसाला लागण्याची वेळ आतां आहे आणि आमचे लोक या परीक्षेच्या मुशींतून सोज्वळपणें बाहेर पडतील अशी आमची पूर्ण खात्री आहे.

वऱ्हाड शाळा खात्याचा १८९२-९३ चा रिपोर्ट

ह्या वर्षी अतिशय पाऊस पडल्यामुळें न्यु नाधिक प्रमाणानें जरी सर्व प्रांतवर पिकाची खराबी झाली तरी त्या पासून वणी व इलिचपूर जिल्हे खेरीज करून शाळा खात्यास फारसा अपाय झाला नाहीं. एकंदरींत ह्या वर्षी शाळांचा नंबर व शाळांत जाणाऱ्या मुलांचा व मुलींचा नंबर वाढला असें रिपोर्टा वरून दिसतें.

सन १८९१-९२ सालीं मुलांच्या शाळा एकंदर १२७० होत्या त्या १८९२-९३ सालीं १३२४ झाल्या ह्मणजे मागील वर्षी पेक्षां ह्या वर्षी ५४ शाळा जास्त झाल्या व मागील वर्षां पेक्षां शाळांत जाणाऱ्या मुलांची व मुलींची संख्या ३९३९ नें वाढली. ह्या वर्षी मुलींच्या शाळा मागील वर्षी

पेक्षां कमीही झाल्या नाहींत किंवा वाढल्याही नाहींत तथापि मुलींची संख्या ५७ नें वाढली व बाकीची ह्मणजे १८८२ ही संख्या मुलांची वाढली. सरकारी शाळा ५९ वाढल्या व त्यांत जाणारीं मुलें २०३० वाढलीं परंतु याच्या उलट स्थिति खासगी शाळांची झाली. त्या पांच कमी झाल्या व त्यांत जाणारीं मुलेंही ९१ कमी झालीं वर निर्दिष्ट केलेल्या १३२० शाळां पैकीं सरकारी शाळा काय त्या ८० च आहेत बाकी ५०८ डिस्ट्रिक्ट बोर्डकडे, १७ म्युनिसिपल बोर्डकडे ७१२ खासगी रीतीनें चालविलेल्या. परंतु वर लिहिलेल्या सर्व शाळा सरकारी ह्मणून गणल्या जातात. बाकी निवळ खासगी शाळा अशा ३ च आहेत त्यां पैकीं २ उच्च प्रतीच्या शिक्षणाच्या व एक प्राथमिक शिक्षणाची. या दोन प्रकारच्या शाळांत जाणाऱ्या मुलांची संख्या अनुक्रमें ९८ व २५ आहेत बाकी वर लिहिलेल्या शाळांत जाणाऱ्या मुलांची संख्या ५०९१९ आहे. अकोला, खामगांव व शेगांव येथील म्युनिसिपालिट्यां चें उत्पन्न वाढलें आहे. बाकी सर्व म्युनिसिपालिट्यांचे उत्पन्न कमी झालें आहे तरी मागील वर्षापेक्षां त्यांतून जास्त ३००० रुपये खर्चण्यांत आले. यापैकीं अकोला, खामगांव, उमरावती व इलिचपूर येथील म्युनिसिपालिट्यांनीं जास्त रक्कम शाळाखात्याकडे खर्च केली व बाकीच्या तीन ह्मणजे आकोट, वाशीम व शेगांव येथील म्युनिसिपालिट्यांतुन मागील वर्षापेक्षां कमी रक्कम खर्चण्यांत आली. एकंदरीनें त्यांतील देणग्या शेंकडा १·८ पासून ८·५ प्रमाणानें वाढल्या आहेत. सगळ्यांत श्रेष्ठत्व खामगांव म्युनिसिपालिटीनें मिळविलें. कारण शेंकडा १४ २ प्रमाणें विद्याखात्याकडे तिजून खर्च करण्यांत आला. लोकांकडून देणग्या देण्यांत आल्या त्यांत मागील वर्षा पेक्षा या वर्षी २७०० रुपये जास्त मिळाले यांत जास्त देणग्या देण्यांत आल्या अशा ४ जिल्हातच. बाकी दोन जिल्ह्यांत मागील वर्षीचें प्रमाण उतरलें आहे. यांत मोठ्या देणग्या दोन गृहस्थांनीं दिल्या. एक रुपये ५०० ची देणगी रा भोनाजी बाबंदजी शिरसगांव बंड येथील पोलीस पाटील यांनीं दिली व दुसरी रुपये २०० ची देणगी मि. मुळजी जेठा नांवाच्या गृहस्थांनीं दिली. या वर्षी एकंदर शाळाखात्याकडे ३३७५४४-१४-६ खर्च झाला. हा खर्च मागील सालापेक्षां २६५६-६ ९ पैसे अधिक झाला. या वर्षी अतिशय पर्जन्यवृष्टीमुळें फिरणें अशक्य झालें होतें. तथापि डायरेक्टर साहेब ४ जिल्हे फिरून त्यांनीं एकंदर १९९ शाळा तपासल्या. त्यांचा दवरा १२८४ मैलांचा झाला. त्याच प्रमाणें एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांनींही फार उत्साहानें काम केलें व ते एकंदर २४५१ मैल फिरले व त्याच प्रमाणें डेप्युटी व सबडेप्युटी एजुकेशनल इन्सपेक्टर्स यांचेंही काम संतोषजनक झालें. मागील सालापेक्षा डेप्युटी कमिशनर्स व एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर्स हे कमी वेळा शाळा पाहण्यास आले व या वर्षी स्कुल कमेटी कडून फारच संतोषदायक काम झालें.

कालेजातून स्कालरशिपवाले विद्यार्थी असे १८९३ त १ च अहेत. हा नंबर १८९२ पेक्षां ४ नें कमी आहे. स्कालर्स मध्यें ह्यावर्षी ( १८९२-९३ ) १ च विद्यार्थी पी. ई. शिकणारा पास झाला. विश्वविद्यालयांत शिकणाऱ्या वऱ्हाडांतील इतर विद्यार्थ्यांपैकीं १८९१ सालीं ७ फर्स्ट बी. ए. ची परीक्षा पसार झाले. १ इंटरमिजिएट, १ एल सी. ई. आणि एक एल. एल. बी. परीक्षा पसार झाले.

या वर्षी आकोले हायस्कुलांत प्रत्येक विद्यार्थ्या मागें ८५ रुपये १० पै खर्च झाला उमरावती हायस्कुलांत ५३-५-९ व मिडल क्लासस्कूलांत १३ रुपये ६ आणे ६ पै झाला. या वर्षी आकोले हायस्कुलांत मुलें कमी झालीं याचें कारण जळगांव व आकोट येथील ॲंग्लोव्हरन्याक्यूलर शाळांना ८ व्या इयत्तेचा क्लास जोडला ह्मणून, असें दर्शविण्यांत आलें आहे. आकोलें हायस्कुलांत संख्या कां कमी झाली याचीं कारणें आफिशिऐटींग हेडमास्तर यांनीं जो रिपोर्ट केला त्यांत दिलीं आहेत. याचें खरें व योग्य कारण डायरेक्टर साहेबांच्या लक्षांत येऊन रिपोर्टांत त्याचा त्यांनीं उल्लेखही केला आहे. तें हें कीं आकोल्याचे हेडमास्तर हे फार कडक आहेत आणि ज्या वर्गांत मुलाला शिकावयाचें असेल त्या वर्गांत राहून शिकण्यास तो जास्त वयस्कर आहे असें त्यास वाटलें ह्मणजे ते त्यास शाळेंत घेत नाहींत. परंतु उमरावती हायस्कुलांत अशी गोष्ट घडून येत नाहीं. बाकीरणी तेथील हेडमास्तर इतके कडक नाहींत अथवा त्यांचें मत निराळें आहे या कारणामुळें हायस्कूल जास्त लोकप्रिय झालें आहे व तेथें विद्यार्थ्यांचा भरणा फार असतो.

( पुढें चालेल. )

---

कै. नामदार तेलंग यांच्या मरणामुळें मुंबई हायकोर्टाच्या एका जज्जाची जागा रिकामी पडली त्यावर कोणत्या नेटिवाची नेमणूक होते हें पाहण्याकडे सर्व राष्ट्राचे डोळे लागले होते. नामदार बद्रुदीन तय्यबजी बारिस्टर यास ही जागा पतकरण्यासाठीं विचारणा झाली होती परंतु त्यांना स्वातंत्र्या पेक्षां हा सरकारी मान कमी वाटला. त्या नंतर रावबहादूर महादेव गोविंद रानडे एम.ए.एल. एल. बी. यांची नेमणूक त्या जागीं करण्याचा लार्ड हारिस साहेबांचा विचार झाला आणि ती नेमणूक पक्कीच झाली हें कळविण्यास आनंद वाटतो. डाक्टर भाण्डारकर यांस युनिव्हरसिटीचे व्हाइस चान्सेलर नेमिलें आणि रावबहादुर रानडे यांस हायकोर्टचे जज्ज नेमिलें या दोन्ही गोष्टी मध्यें गव्हरनर लार्ड हारिस यांनीं जी अप्रतिम गुणग्राहकता दाखविली त्याबद्दल त्यांचें कोण अभिनंदन करणार नाहीं? या उभय नेमणुकी विषयीं सर्व राष्ट्राचे आनंदोद्गार एक वाक्यतेचे आहेत हें कळविलें ह्मणजे पुरें आहे.

तशीच दुसरी आनंदाची बातमी कळते कीं वायव्य प्रांताच्या हायकोर्टाच्या जज्जाची एक जागा नामदार जस्टिस महमद यांनीं पेनशन घेतल्यामुळें रिकामी झाली तिजवर मि. द्वारकानाथ बानरजी बारिस्टर यांस नेमिलें आहे. ही गोष्ट यथायोग्य झाली आणि नेटिवांस दिलेल्या जागा नेटिवास परत मिळाल्या, हें उत्तम झालें.

---

यंदा लाहोरच्या राष्ट्रीय सभेला मोठी विलक्षण शोभा येणार आहे. मागील सर्व समारंभा पेक्षां यंदाचा समारंभ मोठा अप्रतिम व आनंदकारक होईल असा रंग दिसतो. नामदार दादाभाई नवरोजी, मि. ह्यूम, व मि. नार्टन हें राष्ट्रीय सभेला येण्यासाठीं येत्या १८ वे तारखेला विलायतेहून निघणार आहेत. वृद्धापकाला मुळें दगदग होत नाहीं ह्मणून इंडियांत येण्याचा मानस नव्हता तरी मि. ह्यूम या देशाच्या कल्याणासाठीं यंदा येण्यास चुकत नाहींत हा सर्वांनीं कित्ता घेण्या सारखा आहे पुत्रशोक झातारपणांत झाला अहे तरी त्या हानीला न गणतां नामदार दादाभाई नवरोजी यांनीं राष्ट्रकार्यासाठीं कंबर पक्केपणी बांधली हें पाहून सर्वजण नवल करितील. राष्ट्रकार्यें ' देह जावो अथवा राहो ' अशाच तुकारामा सारख्या निस्सीम भावानें सफळ होत असतात हें नित्यशः स्मरणांत वागविलें पाहिजे.

---

बुडत्याचा पाय खोलांतच त्या प्रमाणें हिंदुस्थानच्या रुप्याची व्यवस्था झाली आहे. हिंदुस्थान सरकारनें एकदम कायदा केला आणि चलनी नाणें जो रुपया त्याची कृत्रिम किंमत वाढविली आणि प्रजेला सर्व प्रकारें अप्रत्यक्षपणें नागविलें. अमेरिकन स्वतंत्र संस्थानानें आपला ' शेरमनचा कायदा ' रद्द केला त्यामुळें चांदीची चांदी उडाली आहे. शेरमन आक्ट चालू होता तों पर्यंत अमेरिकेंत दरमहा सुमारें ४५ लक्ष औंस रुपें खरेदी होत असे. आणि त्यामुळें रुप्याला गरजेच्या मानानें भाव चांगला येत होता. पण तो कायदा रद्द होण्या बरोबर मुंबईस चांदीचा भाव १०० रुपये भाराला ८५ वर येऊन बसला. तो हल्लीं थोडा वाढला आहे तरी एकंदरीनें नुकसान या देशाचेंच!

शेरमनचा कायदा ज्या पार्लमेंटच्या बैठकीला रद्द झाला त्या वेळीं उभयपक्षां मध्यें मोठें तुमुल वाग्युद्ध झालें. सिनेट मधील आलन नांवाचे मुत्सदी त्या बैठकीस पंधरा तास पर्यंत एक सारखें भाषण करित होते. दुसरे कांहीं वक्ते दहा दहा तास पर्यंत बोलत होते. या सर्व वादविवादाचा हेतु असा होता कीं, विरुद्ध पक्षाला जेरीस आणून त्यांचे लोक कंटाळून उठले ह्मणजे त्यांच्या पश्चात् मतें घेऊन शेरमन आक्ट रद्द होऊं देऊं नये. पण उलटपक्षानें मोठाच टिकाव धरिला आणि अखेर तो कायदा बहुमतानें रद्द केला. लोकमताचें प्राबल्य काय विलक्षण पहा!

---

इंडियाच्या कायदे कौंसिलांत एक सभासद मध्यप्रांतांतुन असावा असें ठरल्या पासून त्या प्रांताच्या चारही डिव्हीजनमध्यें तो सभासद निवडण्या साठीं सभा भरत अहेत आणि निवडणूकीच्या नियमा अन्वयें कोणी तरी निवडलाही जाईल. पण तो लोकमतानें निवडलेला गृहस्थ कायम करणें किंवा दुसराच त्याच्या ऐवजीं नेमणें हें मात्र चीफ कमिशनरच्या खुषीवर ठेविलें आहे. सारांश निवडणुकीचा अधिकार दिला आणि न दिला यात फरक विशेषसा नाहीं. आणि शिवाय नेहमीं निवड योग्यच मनुष्याची होईल अशीही खात्री नसते. नागपूर डिव्हीजन कडून श्रीमत गंगाधरराव चिटणीस यांची निवड झाली आणि राव बहादूर नारायण स्वामी नायडू यांचा पाडाव झाला हें पाहून तिकडील पत्रकार खेद प्रदर्शित करितात. तथापि मध्यप्रांतांतून एक सभासद नेमला जात आहे ही गोष्ट कांहीं कमी आनंदाची नाहीं. वऱ्हाड प्रांत या हक्काला लायकच नाहीं कीं काय? इकडे धड इंग्रजी नाहीं, धड मोगलाई नाहीं—ह्मणून कांहीं विशेष ह्मणवत नाहीं.

---

### Ourselves

Our subscribers will, we hope, allow us the ussual Dewali Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our officers will be closed for these days there will be no paper issued on the 13th current.

---

## The Berar Samachar

**MONDAY NOVEMBER, 6, 1893**

This year's Educational Report has been just out. It is as usual most ably written and contains much information. We propose reviewing it towards the close of this month. Suffice it to say it abounds in numerous questions of intrinsic value.

The Bombay Gazette of the 31st. Ultimo is at a loss to know whether the cause of Education has made any progress in Hydrabad Assigned Districts. This misgiving of that journal is probably based on the soldier—like review of Colonel Mackenzie. The Bombay Dailies have of late assumed an entirely unnatural attitude and we are glad that even a spirit to misrepresent has not been able to notice anything assailable in the main report.

If the success of of Educational administration is to be determined by the proportion of school—going population to the number, the administration has been extremely successful. Though we advocate a measure of compulsory primary education, in the absence such a measure, Berar has made steady and rapid progress which is almost incredible. If instead of confining himself to Colonel Mackenzie's review, the Editor of the Bombay Gazette had taken the trouble of availing himself of the statistical information in the body of the report itself even on his vision the truth would have forced itself. Only a week ago that journal has reviewed the report on the working of the educational administration in the Central Provinces. The Editor finds in that report no foible. Even in this be has none to find and therefore he restricts his comments on the Commissioner.

In ten years' time, during the long and continuous administration of our esteemed Rao Bahadur Jatar the Department has been able to show a marvellous increase in schools, and numbers. The cause of primary education has been promoted. The higher education too returns equally satisfactory results. Some ten years ago, both the High Schools hardly passed half a dozen students at the Bombay University Matriculation Examination. But now the number of successful candidates every year from these High Schools has increased to more than fourfold. These are all points culled from the body of the Report itself. But it was below the transcendental dignity of the learned editor to refer to them. This year's Report however does not end with the cut and dry, formal and rubric paragraph of thanks to the vigorous administration of the Director of Public Instructions. This is the reason why

the Editor is in a puzzle.

People living far off have no means to ascertain facts. They are guided by a few cursory remarks in the Bombay Dailies. Had they not established their preposterous propensities so palpable of late, the opening sentence of the brief editorial would have deserved contradiction in detail. There is no occasion for it now. We have ever maintained that the kind officer at present at the Head of Educational administration is such a worthy gentleman that even Malice itself will be hardly able to assail him with propriety. He has kept almost all his subordinates contented. His strong hold on the knowledge of human affairs, his equally strong sense of justice tempered with mercy are more than any thing else the chief cause of this brilliant success of the Educational Department. They have secured him energitic Inspectors and schoolmasters doing their utmost to give effect to his policy.

Nothing we trust can be more gratifying to an officer to learn that he is most devotedly admired by his subordinates. The whole department has the deepest veneration for its head. The earning of such confidence and opinion has its own reward. Any one who looks back at the state of Education in this province—say some fifteen years' ago—and looks at its present state, will be convinced that the cause of education has advanced, teachers are doing their utmost to secure accessions to their schools, and parents too are being enlightened as to what would promote the welfare of their offsprings better. If we reflect on the strides the Department has made since it was first opened nearly thirty years ago each year is a year of progress. Particularly during the last ten years, village—schools have increased, the numbers of school—attending children has increased and along with these even Higher Education has made a sticking progress. To whom is all this due? To turn to the drift of of our subject should English journalism not come forward to recognise merit when it so palpably exists? It is very easy to condemn the Hindus as savages, and treacherous, and what not! Those who have read the lives of the Hon. Justice Telang and the Hon. Raosahib Mandlik on their deaths must have been simply re—volted to find several facts distorted and misrepresented! But this is English journalism and therefore free from any demerit! No doubt in this year's Educational Report, the re—views of the Commissioner and of the Secretary for Berars to the Resident, divest the set, and formal paragraphs. Hence a superficial reader like the Editor of the Bombay Gazette may fall into a puzzle. But should, the Editors of responsible and influential journals, thus absolve themselves of their responsibilities?

As we are going to review the report soon, we have contented our selves with stating the opening sentence in the Bombay Gazette. We have also shown that it has its origin in a purely unthought of and careless reading. We have thus shown what worth it is. Before finally leaving this subject however we want further to state that all that an able officer at the head of an important administration could do to ensure its success has been done. His authorities have in fact given him no support. In Bombay, even in the Central Provinces public emplopments are open to the educated alone. The greater the educational qualification, the greater and more effective preferential claim to public service The state of pubic service is extremely deplorable here. We see in all Departments worthless men of ted promoted for avowed and proved incompetency! Thus there is no stimulus to Education in this province. Whenever a Deputy Commissioner has the rare delicacy of saying "no" to an applicant, he is asked if he has University standard! If unfortunately he has not any, a University test is professed to be an essential qualification! If fortunately he has it he is asked if he has official experience; Except in returning negative answers Berar authorities do not even know what commodity Educational tests is. Primary Education is the basis; a stimulus to higher education; encouragement to it; and the grant of some privileges to it prove in course of time a direct encouragement even to primary education. The absence of such rules has long fostered a system of nepotism favouritism, inefficiency, undue arrogancy. We have ever pointed to this grievance and shall further do it when we come to review the report itself.

---

Mr. H. S. Nicholetts the Deputy Commissioner of Amraoti has requested us to direct the attention of our readers to the inquiries instituted by the Commission appointed by the Government of India in connection with the cultivation preparation, and consumption of Ganja and hemp drug. He will thankfully receive any private opinions in regard to the prohibition or restriction of the sale of Ganja and hemp drug.

---

The official tours have attracted the attention of the Resident who has now recently issued a circular directing the system to be followed. The following quotation from the Revenue report will explain how the matter now stands:—

"The Resident is glad to notice that the tours of the several Deputy Commissioners were arranged in communication with the Commissioner, and that this important duty is being gradually brought under systematic control. His impression, however, is that some Deputy Commissioners spend unnecessary long periods in camp, and that a larger measure of out-door work might usefully be entrusted to Assistant Commissioners. For instance, in the Amraoti District no Assistant Commissioner went into camp at all, while the Deputy Commissioner was out for 148 days. Mr. Plowden believes that all the work which is really necessary for a Deputy Commissioner in Berar himself to perform could, in ordinary circumstances, be done in two months, leaving the remaining two months of the camping season for the employment of the younger officers."

---

In his review of the Local Fund Report for 1892 the Resident makes the following observations in regard to the income and expenditure of the District Boards in Berar.

"The total income of all the District Boards amounted to Rs. 10,66,431. Of this amount Rs. 3,19,985 represented the actual receipts of the year, but the requirements of Rule 8, Part II, of the Rular Boards Rules of 15th March 1882 have not been complied with. The result is that the true income of the year has not been fully set out, and the elements necessary for a comparison of the pecuniary circumstances of the several Boards are not available. The principal item in the list in paragraph 8 is "Provincial Rates," the details of which are shown under head VI, statement II. The Resident would have liked to have seen some explanation of the great differences which the entries disclose. For instance Akola has a surplus of Rs. 82,183 under jaglia cess; no other district shows any surplus at all. Again, the education cess in the same district yields Rs. 28,214 against Rs. 6,739 in Amraoti.

The total expenditure of all the Boards aggregates Rs. 6,29,507, of which 27·4 is spent on education. As a consider able share of the expenditure on buildings has been incurred on account of schools, it is probable that the proportion of the Boards' funds devoted to education might safely be estimated at 33 per cent. of the whole amount. As to expenditure on conservancy, water-supply and other cognate matters, the Resident would like to be assured that the Boards are working on some definite system, otherwise much of the money will have been spent in vain. It is hoped that the new wells specified in the list on page 6 have all been constructed on the standard plan. The fact should be mentioned in future reports."

## वऱ्हाड.

सुट्टी.— पुढील आठवड्यांत दिपवाळीचा मोठा उत्साह असल्यामुळें येत्या सोमवारचा ह्मणजे तारीख १३ नोवेंबर १८९३ इसवीचा वऱ्हाडसमाचारचा अंक निघणार नाहीं. साळाबाद प्रमाणें आमचे प्रिय आश्रयदाते आमची ही रजा मंजूर करितीलच असा भरंवसा जाणून आह्मी या सणाची सुट्टी मामुला प्रमाणें घेतली आहे.

रा. रा. नारायण बाबाजी सहस्रबुद्धे बी. ए. हेडक्लार्क - फर्स्ट असि. रेसिडेंट हैदराबाद यांस तीन महिन्यांची रजा मिळाली.

आणि त्यांच्या रजेंत आकोला स्मालकाज कोर्टाचे जज्ज रा. रा. गणेश बापूजी यांस हैदराबादेस तारेनें बोलाविल्या प्रमाणें ते तिकडे रुजूं झाले.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे बी. ए. तहशिलदार उमरावती यांस एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमून आकोल्यास रा. रा. गणेश बापूजी यांच्या ऐवजी पाठविलें. ही बदली ऐकून सर्वांस आनंद वाटेल.

उमरावतीच्या तहशिलदारीवर कमिशनरचे कचेरींतील क्लार्क रा. रा. गोविंद नारायण शवडे यांस नेमिलें आहे. कमिशनर कचेरींत सध्या जे लोक आहेत त्याचें सर्व ग्रह अकरावे आले आहेत असें दिसतें.

मि. इ. मार्शल असि. कमिशनर इलिचपूर यांस गेल्या २०वे तारखे पासून एक वर्षांची फर्लो रजा मिळाली.

राव बहादुर श्रीराम भिकाजी जठार डायरेक्टर यांची स्वारी उमरावती जिल्ह्यांत फिरत आहे. राव बहादुरांच्या नोकरीची मुदत येत्या दिसेंबर अखेर संपत होती पण ती मार्च महिन्या अखेर पावेतों वाढली हें कळविण्यास आनंद वाटतो. वयाचे ५५ वे वर्षा नंतर कांहीं वर्षें चाकरीची मुदत वाढविली असतां चालते. त्याप्रमाणें राव बहादुरांस तो मान मिळाला असता तर त्या नियमाची यथार्थता झाली असती. पण खुद्द राव बहादुरांचा विचार येत्या मार्च अखेर पेनशनच घेण्याचा आहे. ह्मणून आह्मास कांहींच लिहिता येत नाहीं.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं राव साहेब बकुजी सखाराम देशमुख मेसगकर यांस गेल्या २७ वे तारखेस देवाज्ञा झाली. राजश्री देशमुख यांचें वय पन्नाशीच्या आंतच होतें यांस स्वतांला विद्येचा व्यासंग नव्हता तरी यांच्या पाशीं विद्येची चहा फार असे. आकोल्याची लायब्ररी यांच्या मरणा निमित्त एक दिवस बंद होती. सार्वजनिक कृत्यांस यांची नेहमीं मदत असे. आणि याची धर्मवासना विशेष असल्यामुळें दानधर्म, ब्राह्मणभोजनें वगैरे यांच्या हातून पुष्कळ होई. यांस एक कर्ते सवरते चिरंजीव आहेत ते पितृशोक विसरून आपल्या कर्तबगारीनें वडिलांचा लौकिक वाढवितील अशी आह्मास उमेद आहे.

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडीमुंबई दर्शनी | | | ९९॥।– |
| ,, १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥– |
| सुवर्ण २९॥ | रुपे ९३॥। | आळशी | १०२ |
| गहू काठे ६९ | | बनशी | ८० |
| जवारी ५१ | चणे ६० | सर्की | १ |
| कापूस ४४ | | रुई | ६२॥ |
| मीठ ४। तूप ८। | | तेल | ५॥= |

सट्याचे भाव.

| | |
|---|---|
| जवारी वसंत १५ संवत १९४९ | ४५॥।= |
| गहू वैशाख शुद्ध १९४९ | ६२॥।= |
| आळशी चैत्र शुद्ध १९४९ | ९३॥ |
| रुई फाल्गुन शुद्ध १९४९ | ५९ |
| सर्की वै. नवे साळची १९४९ | • |


## जाहिरात.

हे पाक पहा वाशिवाय ता. २६।१२।९२ इ. चे वैदर्भांत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

या हेमंत ऋतूंत हिवाळ्यांत खाण्यानें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल; व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतिणीस व सर्व स्त्रियांस शक्ती देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. वाटेल यांनीं मागविल्यास आह्मी व्हाल्यूपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

१ सालममिश्रीपाक दर शेरा (८० तोळेपास) } किंमत ३ रु.

२ बदाम पाक........................ २॥ रु.

३ सालममिश्री व बदाम प्रत २........ १ रु.

४ सौभाग्यसुंठ ........................ २ रु.

५ कुष्मांड पाक ........................ १ रु.

६ गोखरू पाक ........................ ७ रु.

७ प्रवाळ, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.


## वर्तमानसार

रयतेच्या अडचणा व गरजा ह्यासाठीं कायदे होत नाहींत तर अधिकाऱ्यांच्या सुखसोईसाठीं व चैनीसाठीं होतात असें म्हणावें लागतें. मिठाच्या कायद्याच्या अद्भुत रचनेनें औषधाकरितां कोणी तोळा दोन तोळे मीठ तयार केलें, बाजारांतून आणलेलें मीठ घाण असलें, अगर त्यांत पाणी मिळविलें, आणि तें शुद्ध केलें तर अपराध होतो असें ठरविलें आहे. खाऱ्या मातीचा उपयोग करणें हा अपराध आहे असें ठरविलें आहे त्यामुळें किती लोकांचा विनाकारण छळ होत आहे. जंगलाच्या कायद्याच्या विचित्र रचनेनें किती लोकांचा गांजणूक होत आहे. तसेंच शिकारी विषयींचा कायदा बनला असतां हजारो हजार गरीब लोकांचा जबर छळ होण्याचें जबर साधन तयार होईल असें ह्या टहर्पाशिवाय मात्र उपाय नाहीं. आमच्या देशांत मांस मारण्याचा धंदा करणारे बहुतेक लोक अज्ञान, विद्याशून्य, आणि गरीब असतात तेव्हां त्यांस कायदा कसा समजणार, त्यांच्या हातून कायदा कसा पाळला जाणार, व मासे मारून उपजीविका करण्याचा त्यांचा धंदा कसा चालणार, ह्याबद्दल लोकांना काळजी वाटणें साहजीक आहे.

हायकोर्ट जज्जाची जागा नाकारली- आनरेबल बद्रुदीन तय्यबजी यांस हायकोर्ट जज्जाची रिकामी असलेली जागा पतकरतां काय असें मुंबई सरकारानें विचारिलें होतें पण ती पतकरण्याचें त्यांणीं नाकारलें असें मुंबईचे टाइम्स आफ इंडिया कर्ते लिहितात.

गोठवलेलें दूध विकण्याचा नवा उद्योग- बर्फ करण्याच्या यंत्रानें जसें पाण्याचें बर्फ करितां येतें त्याच प्रमाणें दुधाचें बर्फ तयार करून तें विकण्याचा एक मोठा उद्योग फ्रेंच लोकांनीं काढिला आहे. दूध गोठवलें असतां तें एक महिन्यापेक्षां जास्त दिवस अगदी ताज्या स्थितींत राहतें, व असें गोठवलेलें दूध पाय वाटेनें, आगगाडीनें, अगर आगबोटीनें हवें तेथें पाठविता येतें. ही उत्तम सोय असल्यामुळें लांब लांब ठिकाणचें दूध मोठमोठ्या शहरीं सहज पाठवितां येईल, व त्याची पुष्कळ किंमत येण्यास अडचण पडणार नाहीं. विकत घेणारानें हें गोठलेलें दूध चुलीवर ठेऊन पातळ केलें कीं, त्यास ताजें दूध प्राप्त होईल. हा सगळा शास्त्रीय शोधाचा पराक्रम आहे.

उपयुक्त शोधासाठीं कशी खटपट आहे पहा- मनुष्याच्या शरीरांत पचन क्रिया कशी चालते हें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहाण्याची हौस अमेरिकेंतील दोघा प्रख्यात डाक्तरांस वाटल्यावरून त्यांनीं जाहिरात दिली होती. तींत इतकाच मजकूर होता कीं, ही क्रिया पाहण्यासाठीं मनुष्याचे नाजूक भाग चिरावे लागतील तेव्हां त्यांत कदाचित त्या मनुष्यास मृत्यु येईल. मरण आलें तरी ही क्रिया करून घेण्यास जो मनुष्य तयार असेल त्यास एक हजार पौंड मिळतील. ह्या जाहिराती प्रमाणें १४२ मनुष्यांनीं अशी क्रिया करून घेण्यास आपण तयार आहों असें सदर डाक्तरांस कळविलें. डाक्तरांनीं एक पहिलवानाचा अर्ज मान्य करून त्याच्यावर ही क्रिया करून पाहण्याचा ठराव केला आहे असें तिकडील वर्तमान पत्रांवरून समजतें. ह्यावरून शास्त्रीय शोधासाठीं युरोपियन शास्त्रज्ञास कशी हाव असते, व ती करितां ते खर्च करण्यास कसे तयार असतात हें समजतें. ह्या प्रचंड व्यासंगामुळें व निकराच्या हट्टामुळें मनुष्य जातीचें अतोनात कल्याण झालें आहे.

दोन वर्षांपूर्वीं कलकत्यास नेटिवांनीं चालविलेलें एक इंग्रजी अन्हिक पत्र चालू होतें. आतां तर्‍ही नेटिवांनीं चालविलेलीं पांच अन्हिक इंग्रजी पत्रें कलकत्ता येथें आहेत.

रामलीलेची मिरवणूक — दिल्ली शहरीं रामलीलेची मिरवणूक दरसाल निघत असते, त्याप्रमाणें यंदा ती मोठ्या थाटानें निघाली होती पण हिंदू मुसलमानांत तंटा बखेडा काहींएक झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर कित्येक मुसलमान ह्या समारंभा बरोबर मोठ्या भक्तीनें मिरवत होते असें तिकडील एक बातमीदार एका इंग्रजी पत्रास कळवितो. शु.सू.

इंग्लंडच्या लोकांनीं हाउस ऑफ लॉर्ड्स नाहींसें करण्याकरितां एक मंडळी स्थापन केली. तिचें नांव ''नॅशनल लीग फॉर दी अॅबॉलिशन ऑफ दी हाउस ऑफ लॉर्ड्स'' या मंडळीच्या संबंधानें जागोजाग सभा होऊं लागल्या आहेत व वर्तमान पत्रांतून चर्चा होण्यास सुरुवात झाली. हाउस ऑफ लॉर्ड्स होमरूल बिल व या सारख्याच दुसऱ्या सुधारणुकेच्या कामाच्या आड या शतकामध्यें आले या बद्दल काहीं सभेंत दिलगिरी वाटल्याचे ठराव केले. ही मंडळी हाउस ऑफ कॉमन्स कडे लवकरच अर्ज करणार आहे. सारांश इंग्लंडांत चमत्कारिक प्रकारची गडबड होण्याचा संभव आहे. हाउस ऑफ लॉर्ड्स नाहींसें होणें ही गोष्ट सामान्य नव्हे. यांत साधारण लोक व बडे लोक यांजमध्यें कलह सुरू झाला आणि पुढें मागें हाउस ऑफ लॉर्डस नाहींसें झाल्यास इंग्लंडांत प्रजासत्ताक राज्याचा पाया पडला असें होईल प्रजासत्ताक राज्याची केवढी योग्यता आहे हें अमेरिका व फ्रान्स या देशाच्या स्थितीवरून इंग्लंडच्या लोकांच्या लक्षांत आलेंच असेल. कांहीं असो इंग्लंडच्या सांप्रतच्या राज्यव्यवस्थेंत बदल होण्याचा समय आला असें दिसतें. आह्मीं आपल्या लोकांस इंग्लंडचे लोक एखादें काम हातीं घेतलें असतां कसे झटतात व नाना तऱ्हेचे प्रयत्न कसे करतात हें लक्ष्यपूर्वक पाहण्याचा व शिकण्याचा हा प्रसंग आहे असें सुचवितों.

आस्ट्रेलियांत घोड्या बैलांना मारावयाचे नाल लोखंडाचे न करितां गाईच्या चामड्याचे करतात.

ईजिप्तचे खेदिव अब्बास पाशा हे इंग्लंडास जाणार आहेत असें समजतें.

फ्रान्स मध्यें इतर देशांचीं तांब्याचीं अगर पितळेचीं नाणीं चालविण्याचें सरकारनें बंद केलें. सु. प.

अमदाबाद येथें घोड्यांची अथवा वाफेची ट्राम्वे बांधण्यासंबंधानें एक कंपनी उभी करण्याची खटपट चालूं आहे. पंचवीस रुपयांचा एक शेअर असे आठ हजार शेअर काढण्यांत येणार असून मि. चंदुलाल बुलाखीराम या नांवाचे कोणी गृहस्थ तिचे एजंट झाले आहेत. बऱ्याच श्रीमान गृहस्थांनीं तिचें पुढारित्व पतकरिलें आहे.

यवनांशीं संग करून सुरापान करणारा हिंदु देवालयांत जाण्यास पात्र होईल कीं काय? असा एक प्रश्न मुत्रा येथील मुनसफ कोर्टांत आला होता; त्याचा निकाल होऊन असा हिंदु आचारहष्ठ्या पतित असल्यामुळें तो देवळांत जाण्यास पात्र नाहीं असा निकाल झाला. क. त.

हैदराबादचे निझाम साहेब यांचे नवाब विकार उलउमराव यांच्या मुलीशीं लवकरच लग्न होणार असून त्याबद्दलची मोठ्या झपाट्याची तयारी चालली आहे

सयद अबदुल हक्क सरदार डिलरजंग यांणीं जुन्या सेक्रेटेरियटच्या जागेबद्दल आपणास कंपन्सेशन मिळण्याबद्दल मुंबई म्युनिसिपालिटीवर दावा केला व त्याप्रमाणें त्यांस २५,४८३ चा हुकूमनामा मिळाला, पण ती रकम बस नाहीं असें समजून त्यांणीं हायकोर्टांत अपील केलें त्यांत पंचवीस हजारांच्या बदली १०,५३६ रुपये दिले म्हणजे बस असें ठरलें व शिवाय अपिलाचा खर्चही त्यांच्यावर घातला. हा दिवाणी न्याय कसा आहे पहा.

सुमारें १०० वझिरी लोकांनीं गोमाळ नज्यांत एक छापा घालून ६० उन्टें नेलीं व ४ माणसें ठार केलीं.

ब्रह्मदेशांतून चीनच्या अंगास रेल्वे करण्याचा विचार चालू आहे. तो रस्ता आपण लवकर न केल्यास फ्रान्स करील व चीनच्या व्यापाराचा आपला फायदा घेईल अशी इंग्रजांची ओरड आहे.

सायाम व बर्मा यांच्या दरम्यानची हद्द कायम करण्याकरतां फ्रेंच व इंग्रज अशा मिश्र कामदारांची पारीस येथें एक सभा भरणार आहे.

आमच्या लायब्ररीकरतां तुमचें एक पुस्तक द्या असें एका लायब्ररीच्या हितेच्छूनें एका ग्रंथकारास पत्र लिहिलें. आपली लेखणी भिक्षा मागण्याच्या कामांत ओली करणें फार निर्लज्जपणाचें आहे हें आपल्यास माहीत नाहीं असें दिसतें असा त्या ग्रंथकारानें जबाब पाठविला.

माटाबल लोक पुन्हा चवताळले असून त्यांचो गोऱ्या लोकांशी एक लढाई ही झाली व गोरे विजयी झाले.

इरावाडी नदीच्या कालव्यांची सर्वे व पाहाणी करण्या करतां सरकारानें एका कामदाराची नेमणूक केली आहे.

आपल्यावर केव्हांतरी कोणा परशत्रूचा हल्ला येईल अशी जपानास फार भीति आहे व प्रसंगीं त्या परशत्रूस आपल्या देशांत शिरतां येऊं नये ह्मणून जपानची तयारी आहे. युरोपांतलीं चोरटीं राज्यें अशक्त व दुर्बळ अशा राष्ट्रांस घशांत टाकण्या करतां टपलेलीं असतात असें मनांत आणून, आपल्यास घशांत उतरण्याची इच्छा करणारा कोणी परकीय आल्यास त्यास दारू गोळ्यांच्या सहाय्यानें माघारें लावण्याकरतां जपान आपल्या दरवाज्यांवर बंदोबस्त करीत आहे. वयांत आलेल्या प्रत्येक जपानी पुरुषानें तीन वर्षें लष्करी शिपायाची चाकरी केलीच पाहिजे, चार वर्षें फर्स्ट रिझर्व फौजेंत राहिलें पाहिजे व ५ वर्षें सेकंड रिझर्व फौजेंत राहिलें पाहिजे असा जपान सरकारानें नियम केला आहे; त्याच्या योगानें नेहमी ७५,००० फौज अगदीं सज्ज असत्ये व लढाईच्यावेळीं सहज त्याच्या तिपट फौज काढतां येत्ये. या इतक्या फौजेस सालिना खर्च अडीच कोट रुपये लागतो.

हैदराबादच्या मुख्यप्रधानाच्या जागीं नवाब विकार उल उमराव यांची नेमणूक करण्याचें घाटत आहे असें सांगतात. ठा. अ.

सन १९०० सालीं पारीस येथें जें प्रदर्शन होणार आहे त्यांत अशी एक विलक्षण दुर्बीण तयार करणार आहेत कीं त्या दुर्बिणींतून पाहिलें तर चंद्र १९ मैलांवर दिसेल. अशा रीतीनें चंद्र इतका जवळ दिसूं लागला ह्मणजे अजूनपर्यंत उलगडा न पडलेले पुष्कळ प्रश्न सोडविण्यास शास्त्रज्ञांस सुलभ पडेल. चंद्रावर हवा, पाणी, जीवजंतु वगैरे आहेत कीं नाहींत; चंद्र हा डार्विनच्या मता प्रमाणें आमच्या पृथ्वीचाच एक तुकडा आहे कीं कसें; अथवा तो एका सूक्ष्म विद्युद्गोलकाचें परिणतस्वरूप आहे; वगैरे प्रश्न वगैरे प्रकारचे होत. या दुर्बिणीची तबकडी १० फूट व्यासाची असून नळी १४० फूट लांब असणार.

खरा उपदेश— आपल्या न्यायबुद्धीला व सदसद्विवेचन शक्तिला अयोग्य वाटेल असें कोणतेंही कृत्य करण्यास तयार होऊं नका; मग त्या योगानें तुमचें वजन, तुमचा आश्रय, अगर तुमचें धन कमी झालें तरी हरकत नाहीं पाप करण्यापेक्षां हजारों लोकांनीं नांवें ठेविलीं तरी बरीं. हांजी हांजी करून पोकळ मैत्री संपादण्यापेक्षां कितीही त्रास व संकटें सोसावीं लागलीं तरी तीं सोसून या जगांत आपला चरितक्रम उत्तम ठेवणें हें खऱ्या मोठेपणाचें लक्षण होय. सतत गरीबीत दिवस कंठणें पडलें तरी धैर्यानें स्वाभिमानाचें रक्षण करून लोकांच्या शिरावरील तुरा होऊन रहाणें हेंच योग्य; पण सोन्याच्या चकाकीला भुलून वेळ येईल त्याप्रमाणें आपल्या सदसद्बुद्धीला स्वरूप देऊन मनाचा मोठेपणा गहाण टाकूं नये. न्या.

---

नोटीस

वि० दिपुटी कमिशनर साहेब बहादूर
जिल्हे उमरावती यांचे कोर्टांतः—
कि० दिवाणी मु० नं० ४ सन १८९३
सन १८८१ चा आक्ट नंबर ५ यांतील
कलम ६९ अन्वयें

मैनाबाई जवजे हरलाल प्राणसुक
जात परवार राहणार उमरावती. } मैत.

ज्या अर्थी चुनियाबाई जवजे रामचंद्र परवार राहणार उमरावती इनें ह्या कोर्टांस सदरहू मैताचे इस्टेटी बद्दल व माल मिळकतीबद्दल सन १८८१ चा आक्ट नंबर ५ कलम ६२ अन्वयें अर्ज दिल्यावरून सदरहू मैताचे जे वारस व ज्यांचा विशेष संबंध आहे असे लोकांस ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं- ही नोटीस वर्तमान पत्रांत प्रसिद्ध झाल्या पासून एक महिन्याचे आंत जे कोणी त्या इस्टेटीचे संबंधानें वारसदार असतील त्यांनीं आपला हक्कसंबंध दाखविण्या करितां मे० निकालेट साहेब बहादुर जिल्हा जडज्य कोर्ट उमरावती यांचे कोर्टांत हजर व्हावें.

कोर्टांचे सही शिक्यानिशी ही नोटीस दिली असे. आज तारीख १४ माहे आक्टबर सन १८९३ इ०

W. V. Chandekar.
Clerk of Court.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ....................८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०।

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over10... 4 ass
Repetition per line 3as

VOL XXVII AKOLA MONDAY 20 NOVEMBER 1893 NO 45

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २० माहे नवंबर सन १८९३ इ० अंक ४५

## फल ज्योतिष ग्रंथ

श्यामभट्ट

रावबहादुर महादेव गोविंद रानडे व रावबहादुर जठार यांचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत. पृष्ट संख्या पांचशें, श्यामभट्टाची सुंदर तसबीर, कापडी पुठ्यानें बांधलेल्या संबंध पुस्तकाची किमत दोन रुपये शिवाय पोष्ट खर्च व्हाल्यु पेबलनें पाठवूं.

चिंतामण मोरेश्वर आपटे.
उमरावती.

## विजया दशमीचें सोनें

This world is all a fleeting show,
For man's illusion given;
The smiles of joy, the tears of woe,
Deceitful shine, deceitful glow—
There is nothing true but heaven!

And false the light on glory's plume,
As fading hues of even;
And Love & hope and beauty's bloom
Are blossoms gathered for the tomb—
There is nothing bright but heaven!
Poor wanderers of a stormy day!

From wave to wave we are driven,
And Fancy's flash and Reason's ray
Served but to light the troubled way
There is nothing calm but heaven!

Moore.

अश्वधाटी.

संसार हा उमज[1] आभास बा मनुज !
वंचावयास तुजला
वाटे मना क्षणिक आनंद; या हटिक—
मोहास लुब्ध न भला ॥
दुःखाश्रुनें स्रजल नेत्रें तुझी तरल.—
हा लाभ बा! वरवरी
हा व्याप सोड लघु —चिन्मूर्ति दिव्य विभु
सृष्टींत एकचि खरा ॥१॥
संध्यारुची रुचिर फांके नयीं अचिर कोतीं हि भंगुर तसी
अशा नरा भुलवि रामा मना खुळवि
यांचे नको पडु फशीं ॥
हें प्रेम बा बिकट यासी नको लगट
प्रेतास पुष्प न बरें
मायीक पाश भवः—चिद्दीपिका विभु सृ
ष्टींत एकचि खरें ॥ २ ॥
हिंडे तुफानगत लाटा प्रचंडहत
दिनापरी नर पहा!
हे कल्पना लहर वा सद्विवेककर मार्गीं
प्रभा अचिर हा ॥
दावी मुहूर्त पथ —वाटे पुन्हां वितथ
आयासभार; न बरा
संसार, हा कहर.—चित्शांतभाव पर सृष्टींत
एकचि खरा॥ ३ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध १२ शके १८१५

रा० रा० चिंतामण मोरेश्वर आपटे इनस्पेक्टर रजिस्ट्रेशन खातें, यांनीं 'फल ज्योतिषग्रंथ उर्फ श्यामभट्ट' या नांवाचा एक मराठींत ग्रंथ रचिला आहे. हे गृहस्थ नोकरीच्या पेशाशिवाय आपल्या ग्रंथ लेखनानें वऱ्हाडांत चांगले प्रसिद्धीस येत आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट होय यांचें वरील पुस्तक फार मौजेचें व उपदेशपर आहे हें लोकाश्रयास व आदरास कितपत पात्र आहे व त्याच्या वाचना पासून काय काय गोष्टी शिकण्या सारख्या आहेत हें निराळें लिहून कळविण्यापेक्षां रावबहादूर नामदार महादेव गोविंद रानडे यांचा त्या ग्रंथा वरील अभिप्राय वाचकांस सादर करणें आह्मास विशेष श्रेयस्कर वाटतें. हा अभिप्राय वाचून आमच्या वाचकांची मूळ पुस्तकाकडे दृष्टी जावी आणि त्यांनीं तें वाचावें याच हेतूनें आह्मी तो प्रकाशित करितों व राजश्री चिंतामणराव यांच्या या उत्तम ग्रंथाबद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करितों.

"श्यामभट्ट व त्यांचा शिष्य बटो यांचा वृत्तांत— हें पुस्तक समग्र वाचून पाहिलें आजकडे बरेंच वर्षांत इकडे अभिप्राया करितां जीं पुस्तकें आलीं, त्यांत ह्या पुस्तकाच्या योग्यतेचें क्वचितच पुस्तक आढळण्यांत आलें. फलज्योतिषावर जी आपल्या लोकांची अत्यंत श्रद्धा आहे ती बहुतेक अंशीं निर्मूळ व अहितकारक आहे हें दाखविण्याचा मुख्य उद्देश मनांत धरून पुस्तककर्ते राजश्री आपटे यांनीं ही गोष्ट रचली आहे, व त्यांत जरी कांहीं ठिकाणीं मुख्य उद्देशास सुटून विषयांतर झालें आहे, तरी एकंदरींत गोष्टीचें अनुसंधान चांगल्या प्रकारें आरंभा पासून शेवट पर्यंत राखलें आहे. फलज्योतिषा सारख्या गोष्टीविषयीं लोकांत अश्रद्धा उत्पन्न करण्याचे मुख्य दोन मार्ग, एक तत्वविचाराचा, व हल्लींच्या गोष्टीसारखी गोष्ट रचून अत्यंत श्रद्धा ठेवल्यानें व्यवहारांत कसे फसगतीचे प्रकार होतात हें दाखविणें हा दुसरा मार्ग. तत्व विचाराचा मार्ग अशा कामीं फारसा उपयोगी पडत नाहीं; ह्मणून या दुसऱ्या मार्गाचें अवलंबन ग्रंथकर्त्यांनीं केलें आहे तें यथयोग्य आहे इंग्रजींत स्पानिश भाषेंतून भाषांतर झालेलें (डानकिझोट) या नांवाचें एक पुस्तक आहे. सुमारें ४०० वर्षांपूर्वी युरोपांतील कांहीं देशांत वेड्या शिलेदारीचें खूळ फार पिकलें होतें. त्यावेळीं त्या वेडाची फजिती करण्या करितां ह्मणून डानकिझोटची गोष्ट स्पेन देशांतील एका ग्रंथकर्त्यानें रचली. त्या गोष्टीच्या धर्तीवरती ही श्यामभट्टाची गोष्ट रा. आपटे यांनीं रचिली आहे. इकडे वेड्या शिलेदारीचें खूळ नाहीं, व इकडील रिवाजा प्रमाणें तशा खुळास जागाही नाहीं. या मुळें मूळ गोष्टीच्या धर्तीवर ही गोष्ट रचतांना त्या सारखें आपले देशांत जें फलज्योतिषा विषयींचें वेड आहे तें घालविण्याच्या उद्देशानें मूळ गोष्टीचें रूपांतर केलें आहे. त्यांत रा. आपटे यांणीं फार कौशल्य दाखविलें आहे. सदरील रूपांतर झाल्यामुळें. गोष्टीचें संविधानकही बदलावें लागलें, त्या प्रमाणें बदलून मुख्य उद्देशास न सुटतां रचना फार चांगली केली आहे. मूळ गोष्टींत ज्या प्रमाणें मुख्य नायक डानकिझोट व त्याचा नोकर सांकोपांझा यांचें हुबेहूब चित्र बठविलें आहे त्याच प्रमाणें श्यामभट्टाचे गोष्टींत श्यामभट्ट व बटो या पात्रांची योजना होऊन कथाभाग चांगला साधला आहे. इंग्रजींतून ग्रंथ स्वभाषेंत करणें झाल्यास मुळास किती चिकटून राहावें व कोठपर्यंत रूपांतर करावें या विषयीं नियम घालून देतां येत नाहींत. तथापि रा. आपटे यांनीं ज्या प्रमाणें रूपांतर करून ही गोष्ट रचली आहे तशा गोष्टी रचल्या गेल्या तर मराठी भाषेची उन्नति खचित होईल मूळ पुस्तकाचा विस्तार फार मोठा आहे. श्यामभट्टाच्या गोष्टीचा विस्तार तितका नाहीं, तथापि जे पांच सात प्रसंग त्यांत वर्णिलें आहेत तेवढ्यानें कार्यभाग होणार आहे. फलज्योतिषाच्या ग्रंथा विषयीं माहिती करून घेऊन नंतर पुस्तक लिहिलें आहे. किंवा कसें या विषयीं प्रथमतः थोडीशी शंका वाटत होती; परंतु या पुस्तकांत ज्योतिषांतील वचनांचे जे आधार दिले आहेत ते मुळाशीं तपासून पाहिल्या वरून ती शंका दूर झाली. फलज्योतिषावर अत्यंत विश्वास असल्यानें हल्लीं किती अडचणी येतात याचा विचार केला असतां या श्रद्धेचें निरसन होणें अति अवश्य आहे. तो हेतु कांहीं अंशानें तरी ही गोष्ट वाचल्यानें सिद्धीस जाईल असा भरंवसा वाटतो. गोष्टीच्या संविधानकांत छत्रपति शिवाजी महाराज व श्री रामदास स्वामी यांच्या हातून श्यामभट्टाचे वेड घालविण्याचा प्रयत्न झाला आहे तोही प्रकार चांगला साधला आहे. ग्रंथाची भाषा प्राकृत तऱ्हेची सर्वांस समजण्या सारखी आहे. केवळ मराठी भाषेच्या अंगीं सर्व रीतीचे अर्थबोध करण्याचें सामर्थ्य किती आहे हें या पुस्तकांत स्पष्ट वीशेषीं चांगलें दिसून येतें. पुस्तकाचा हेतु मुख्यत्वें थट्टा करण्याचा असून ती थट्टा ग्राम्य शद्बांनीं न करितां पात्राच्या तोंडूत सहजगत्या निघालेल्या द्वारांनीं व एकंदर गोष्टीच्या संविधानकानें स्पष्ट झाली असल्यामुळें वाचकांच्या मनास बोध व आनंद दोन्हीही होण्याचा संभव आहे. फलज्योतिषाचा ताळा पुष्कळांस पटत नसून श्रद्धा कमी होत नाहीं यामुळें अशा अस्पष्ट थट्टेच्या द्वारें त्याचे अन्यथा स्वरूप दाखविणें जरूर होतें यास ग्रंथकर्त्याचा उपाय नाहीं. पृथ्वी किती क्षुद्र गोळ आहे व त्यावर राहणारे मनुष्य प्राणी हे किती क्षुद्र जीव आहेत याचें खरें ज्ञान ज्यास होईल त्यास शुभाशुभ ग्रह राशीचा संबंध प्रत्येक मनुष्याच्या सुखदुःखाशीं असेल असें कधींही मनांत येणार नाहीं. त्यांतून असा संबंध आहे असें मानिलें तरी इष्टानिष्ट परिणामाचें द्योतक मात्र नक्षत्रें ग्रह व राशी होतील. त्या ठिकाणीं कार्य कर्तृत्व कल्पितां येणार नाहीं. हें कार्य कर्तृत्व परमेश्वराकडे आहे व त्यानें कांहीं अंशानें मनुष्याच्या स्वाधीन ही गोष्ट ठेविली आहे. हाच मनुष्यजन्माचा मुख्य अधिकार सर्व धर्मांनीं मानिला आहे. ते सर्व धर्म विचार एकीकडे ठेवून, परमेश्वराची सत्ता ही कमी करून, युक्ति व अनुभव याचा आधार नसतां, हें जें मिथ्या वेड्या श्रद्धेचें पाखांड देशांत पसरलें आहे तें ज्या दिवशीं दूर होईल तो सुदीन आहे. तसा सुदीन कांहीं अंशानीं तरी लवकर आणण्याचें श्रेय राजश्री आपटे यांस प्राप्त झाल्यास त्यांच्या श्रमाचें साफल्य होईल. याज करितां हा ग्रंथ सर्वांच्या आश्रयास पात्र आहे."

## राजा प्रजा आणि तिचें शिक्षण

( ४० वे अंकावरून पुढें चालूं. )

आतां आमच्या या हिंदुस्थानांत शिक्षणा संबधानें आमच्या सरकारचें कसें काय वर्तन आहे या विषयीं थोडा विचार करूं. या भरतखंडांत आमच्या राज्यकर्त्यांना पाय ठेवण्याला दोन, अडीच, शतकें झालीं. प्रथमतः ते मारवाडी पेशा घेऊन, हातांत शेलदांडी घेऊन व्यापाऱ्याच्या मिषानें आले. हें सन १८४० किंवा त्याच्या पाठीमागचे जे रुपये आहेत त्यावर असणाऱ्या कान्याच्या छापावरून व्यक्त होत आहे. व्यापार वाढतां वाढतां मग त्यांच्या मनांत कांहीं राज्यकारणीं विचार येऊं लागले. त्यावेळीं असणारी इकडची मोंगल पादशाही पाहून त्यांच्या तोंडाला हळू हळू पाणीं सुटलें. हुशार खरे, युक्तिप्रयुक्तीनें चंचुप्रवेश करतां करितां मुसळ प्रवेश त्यांनीं कसा केला हें सर्वांना इतिहासा वरून ठाऊकच असेल. कावेबाजपणा करून लुच्चेगिरी आरंभून, घरभेदीपणाची मसलत घेऊन बका सारखें कपट युक्त

मौनव्रत धारण करून, कधीं कधीं--शस्त्रास्त्रांचा प्रयोग चालवुन--कसेंही करून त्यांनीं आजरोजीं हिंदुस्थानची " गादी " पटकाविली आहे व आपलें पूर्ण साम्राज्य स्थापिलें आहे, व राज्यलक्ष्मीचा यथेच्छ उपभोग घेत आहेत. घेतना कां? परमेश्वराची पूर्ण कृपादृष्टि आज त्यांचेवर आहे ह्मणून ही त्यांचा सध्यांची सद्दी चालत आहे. पुढें मागें कोणाला ठाऊक यांचें काय होणार तें! अशा घडामोडी ईश्वर ही विश्वलीला जोंपर्यंत करीत आहे तों पर्यंत चालणारच. हाच हिंदुस्थान हजार दोन हजार वर्षां पूर्वीं " भरतखंड सुवर्णभांण्डं" ह्मणून गाजत नव्हता काय? व सर्व प्रकारें सुधारणेच्या शिखराला जाऊन पोंचला नव्हतां काय? फार कशाला मऱ्हाटेशाई व पेशवाईला फार दिवस होऊन गेले नाहींत. त्या वेळचीं या देशाची भरभराट, त्यांचा दरारा, त्यांचा धाक यांची वाचकांना माहित नाहीं काय? पण आज तें सर्व कांहीं कालचक्राच्या सपाट्यांत फिरून गेलें आहे. यांत ह्मणजे फारसा विषाद वाटण्याचें कारण नाहीं. व तो वाटला तरी त्याचा उपयोग काय? असो. एवढें खरें कीं आज इंग्रज आमचे राज्य कर्ते व आह्मी त्यांची प्रजा. व आह्माला त्यांच्याशीं त्याच नात्यानें वागणें रास्त आहे. व त्यांनाही आमच्याशीं त्यांच्या पदवीला शोभेल अशा तऱ्हेनें वागणें हें उचित आहे. हें कोणी ही उदारमनाचा पुरुष प्रांजलपणें कबूल करील हें सर्व ठीक आहे. पण खरा प्रकार असा आहे काय? किती झालें तरी हिंदुस्थान देश आमच्या पासून लुबाडून घेतलेला लोकांमध्यें सहाजिक होणारी अस्वस्थता, ती पासून उत्पन्न होणारी दहशत, या सर्व गोष्टी लक्षांत आणून देशामध्यें पूर्ण शांतता राखण्याचा प्रयत्न आमच्या सरकारांनीं चालविला. व तो राज्य प्रकरणाच्या सूत्रा प्रमाणें बरोबरच होता, आमच्या सरकारानीं आह्माला त्यांचा विश्वास पटेल अशा तऱ्हेचे मोठ मोठे जाहीर नामे मलीकामा अझमा व्हिक्टोरिया बादशाहिणीचे सहीचे या देशांत शहरोंशहरीं लाविले. तुमचें पालन पोषण चांगलें करूं. तुमच्या धर्मांत हात घालणार नाहीं. तुह्माला आमचे ज्ञान भांडार दाखवूं तुमचा व्यापार वाढवूं, तुम्हांला सुखी राखूं व पिता व पुत्र या नात्या प्रमाणें आह्मी तुमच्याशी सर्व प्रकारें व्यवहार ठेवूं! व अशीं अनेक कलमें त्यांत होतीं. व त्या प्रमाणें सरकारानें आमच्या लोकांना प्रथम मोठाल्या हुद्याच्या जागा दिल्या. त्यांना पगारही खूप ठेविला लोकांच्या शिक्षणा करितां हजारों शाळा स्थापिल्या. व शिक्षण फुकट देण्याचा क्रम जारीनें सुरूं ठेविला. अशा तऱ्हेनें बिथावलेल्या लोकांचीं मनें एकदां शांत केलीं. व अशींच मवाचीं गोड गोड भेटें लावून आह्माला मिटक्या मारीत ठेविलें. पण आमचें सरकार वस्ताद. आह्मी हे मिटक्या मारतां मारतां खूप रंगांत आलों आहों असें पाहून मग त्यानीं आपल्या देशांतून एक भला मोठा पेच आणला. व तो आमच्या अंगात विळण्याचा हळूं हळूं प्रयोग चालविला. आमची संपत्ति जितकी लुटवेल तितकी लुटून नेण्याचें आरंभलें, मोठमोठ्या हुद्याच्या जागेवर आमच्या लोकांनां ठेविणासे झाले. शिक्षणासंबंधीं आपलें अंग काढून घेऊं लागले. अतोनांत कर बसवून आह्माला कंगाल करण्याचा रोख ठेविला, आमचीं शस्त्रास्त्रें आमच्या पासून काढून घेऊं लागले, व त्या योगानें आह्माला निःसत्व व निःशक्त करून सोडलें, इतके दिवस पर्यंत आह्माला त्या पेचाची कांहींच माहिती नव्हती. पण तो पेंच त्यानीं पिळतां पिळतां तो अगदीं आमच्या मर्मस्थानाशीं येऊन ठेपला तेव्हां आह्माला कळलें; व मग आतां आह्मी जागे झालों, व आमचा तो चाललेला रंग एकदम नाहींसा झाला, व आतां आह्मी पूर्ण जागे झालों. व हा त्यांचा ह्मणजे आमच्या सरकाराचा--कावेबाजपणा आमच्या लक्ष्यांत येऊं लागला, पण उपयोग काय?

वाचक हो! नुकतेंच मुंबई युनिव्हर्सिटीची ग्रांट कमी केल्याचें आपण ऐकिलें, हें आमच्या उदार मायबाप सरकारनें कां बरें केलें. कित्येक ठिकाणीं हायस्कूलें ही बंद पाडण्याचा विचार चालविला आहे. सेन्ट्रल प्राव्हिन्सिस् मधें सरकारानें घातलेल्या शाळा पाठशाळा फारच थोड्या आहेत. प्राथमिक शिक्षण व उच्च प्रतीचें शिक्षण यांच्याकडे कानाडोळा सरकार कां बरें करतें. आमचे लोक इतके शहाणे झाले आहेत काय की आतां शिक्षण देण्याची कांहींच जरुरी राहिली नाहीं. अथवा आमचे लोक इतके श्रीमान व पैके वान झाले आहेत काय की त्याच्या हांतुन आपल्या देश बांधवाचें शिक्षणाला मदत होईल. किंवा सरकाराला अशी कांहीं सबळ कारणें आहेत काय कीं त्या योगानें सरकाराला शिक्षणाकडे द्यावा तितका पैसा देतां येत नाहीं. असे तीन प्रश्न सहज उद्भवतात. व त्यांचा उलगडा केला ह्मणजे झालें आतां पहिल्या दोन प्रश्नांचा एकमेकांशी बराच संबंध आहे करितां त्यांचा एक वटून विचार केला पाहिजे. (पु० चा०)

रा. रा. गोपाळ कृष्ण गोखले आणि शिवराम हरी साठे, आनररी सेक्रेटरी 'सार्वजानिक सभा' पुणें यांज कडून हिंदुस्थान सरकाराकडे एक अर्ज गेला आहे त्यांत सार्वनिक सभेजनें सर्व प्रजेच्या वतीनें सरकारापाशीं मागणी केली आहे कीं सिव्हील व लष्करी अधिकाऱ्यांस हुंडणावळीचा फरक भरून देण्या विषयीं इंडिया सरकारनें जे नियम केले आहेत त्याची अंमलबारी गत काला संबंधानें होऊ नये ज्यांस प्रत्यक्ष पैसा विलायतेस धाडावा लागतो त्यांसच हा फायदा द्यावा, युरेशिअन लोकांस हे नियम लागूं करूं नये, आणि गेल्या पांच वर्षांत ज्यांनीं चाकरी पतकरली आहे त्यांस या नियमाचा फायदा होऊ नये. ही मागणी मोठ्या जोरदार युक्तिवादानें व दूर दृष्टी पूर्वक झाली आहे पण प्रजेची कळकळ स्वार्थी पुढें सरकारास लागेल तर आपलें मनोरथ सफळ होतील! पुण्याच्या सार्वजनिक सभेनें हा राष्ट्रहिताचा प्रश्न सरकारा पुढें मांडला याबद्दल त्या सभेच्या चालकांचे आह्मी आभार मानले पाहिजेत.

## NOTICE

Notice is hereby given that the Contract for the sale of opium and other drugs in the Akola Taluk will be re-auctioned (owing to the default of the Contractor) at noon on the 27th. November 1893 at the Deputy Commissioner's Cutcherry Akola.

R. D. Hare.
Deputy Commissioner
Akola District.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER, 20, 1893

## VICE REGAL SPEECH FROM AGRA.

The Municipality at Agra justly pride themselves upon their town's having remained aloof from the infection of disturbances so general in the mixed downs. H. E. the Viceroy too in thanking the people for what they have done has expressed his opinion and the policy of this government on the great agitation which convulced the peace of the whole country. His Excellency's speech may be briefly summarised as follows:—

"The religious feelings of both the communities will be respected with due regard to them in keeping with the great Indian Charter of 1858. The disturbers of public peace will be punished with a rigid hand. The doctrine propounded that the government are bent upon setting class against class is wicked. And that the kine will not be slaughtered with any unnatural cruelty and the cow-protection movement will not be stopped." The speech also contains a piece of advice to all newspaper writers. They are as ever reminded that they enjoy the greatest liberty of freedom. This assertion is also conpled with a threat. The Editors are warned against propounding, false, incendiary, and dangerous theories.

So far as the speech is concerned there can be nothing against it. The two sects have maintained a perfect and long continued good feeling and mutual friendship in Berar. We are therefore not much concerned in the matter and we trust there will never be any the slightest occasion for any such warnings and cavillations. Yet one thing still remains to be investigated. It has not yet been ascertained as to who were the aggressors in the late disturbances. It is no great matter now as to who they were. But some steps must be taken towards that move which will secure a lasting peace and harmony between the two communities.

The Mahomedan community and the Hindu community both must clearly perceive that their interests are indissolubly blended together. Religion is ever a pure convention adopted to check the vulgar in check and the powerful within their bounds. Religious intoleration does not serve the cause of God any more than nails serve the cause of war. All dissensions between the two sects have religion at their root. Any fifty men all of different religions and creeds can live together in perfect harmony and yet be strictly orthodox. H. E. the Viceroy has however thrown an unnecessary burden over the Hindus by saying that "it requires two to make a quarrel." The saying is no doubt true only so far that when one party gratuitously molests and injures another and the other party rises to defend itself the two constitute struggling and conflicting body. H. E. the Viceroy has in fact shifted the burden of proof from those to whom it belongs Now that the agitation has subsided and the two sects are again embracing each other as if there were no disturbances, it is time for the Government to render as much assistance as possible to the leaders of both the communities in arriving at resolutions which will for ever silence discord and foster and amity between the twe classes. Whatever has been hitherto done by the Government is simply to check the disturbances. Physical force was brought into use where moral force and Persuasion never prevailed. This may bid a temporary truce but lasting peace cannot be expected till the Government themselves are prepared to prove they have set in working what they profess.

By the bye Mr. Sayani's speech at the Ahamedabad Provincial Con-Conference distinctly lays down the lines on which the work of amity between the two sects should be begun. His main stay is the diffusion of education among the backward classes when he points to us the mistake we made when the late Education Commission held its sitting by not coming forward to cry for education among them we would glady acknowledge our error if we had committed it. In Berar the Mahomedans are charged less schooling than their Hindu brethren. A special encouragement is given to the diffusion of Education among the Mahomedans. Sir Frank Sauter Memorial scholarships endowed to the University of Bombay are exclusively reserved for the Mahomedans. Every where a sort of stimulus is given to this cause. Several Urdu Schools in the Central Provinces are open gratis at the request of the School Committees Mr. Sayani is a man of vast information, great public spirit and has above all united in him the unbounded confidence of both the classes. His assertions therefore deserve the greatest respect. Instead of going so far as to say we differ from such a high authority we would with the greatest respect regret how he ignored these facts. The Mahomedans are to a great extent an indiginous class. Such class is naturally fanatic hoping for a termination of their sufferings in the kingdom of God. Something therefore ought to be more definitely done towards improving their status. No doubt education is one of the few boons of unmixed goodness. But how to secure it to those who have no taste for it and again can not afford to set themselves aside from it being called away from the labour of the loom. This is a problem which we know has long been uppermost in the mind of the present officer at the Head of Educational administration.

H. E. Lord Elgin the future Viceroy of India is like H. E. Lord Reay the most eminent educationist and the champion of technical education. He is yet preparing for his departure from England. It seems he was quite suddenly called upon to the Viceroyalty of India and was almost taken by surprise in being called upon to the responsibilities of Governing an intelligent and progressing Nation. He is expected to leave England towards the middle of the next month.

Mr. Gopal Vaman Bapat B. A.; L. L. B.; is doing very useful work at Amraoti. Not content with the finish he has given to his educational course and priding himself upon his educational status and sneering at the others who are not like him he has opened a class at Amraoti to which he delivers tri—weekly law lectures on Monday, Wednesday, and Friday evenings. This gratuitous service has no parallel and we eanestly wish Mr. Young Bapat's exertions every success. Such men can win the confidence of the people, and are eminently qualified to be the leaders of the people. Some three years ago two other eminent gentlemen from Amraoti, too well known to need mention, left their home at their own expense for distant land to further the noblest of all causes. Shall we long remain in barbarity and ignorance, if we can get such self-sacrificing public men? It is these to whom our thanks are due and not to those brags who waste their energies in sneering at others.

## वऱ्हाड.

हवामानः— गेले आठवड्यात दोन इंच पाऊस पडला. त्या मुळें खरिपाचे पिकास बरेच ठिकाणी थोडी नुकसान झाली त्यांत कपाशीचे पिकास बराच धक्का बसला रब्बिचे पिकास झालेला पाऊस बराच फायदेशीर झाला असें शेतकरी लोक बोलतात. आकाश अजून मेघाच्छादितच आहे. उन्हाळ्या प्रमाणें दिवसा उष्मा होतो मेघराज आतां कृपा करतील तर फार उत्तम होईल. मुदतीचे ज्वर, हिवताप खोकले हे आजार सर्वत्र जारीनें सुरू आहेत.

आम्हांस लिहीण्यास फार दुःख वाटते कीं रा० रा० आत्माराम भिकाजी पेनशनर ए० अ० कमिशनर यांस ता० १० मिनहू रोजी उमरावती येथें देवाज्ञा झाली. रा० आप्पासाहेब हे वऱ्हाडांतील फार जुने कामगार होते.

रा० रा० बाळकृष्ण बळवंत सुळे बी.ए. आ० ए० अ० क० यांस येथील स्माल्लकाज कोर्टावर नेमल्या प्रमाणें ते येऊन दाखल झाले त्यांस स्माल्लकाजकोर्टाचे सर्व अधिकार देण्याविषयीं शिफारस झाली आहे.

सेशन निकालः—चालू असलेल्या सेशन पुढें बरेच महत्वाचे मुकदमे आहेत. वाशीम जिल्ह्यांतील बसके येथील डाक्यांतील ९ आरोपी पैकीं एकास माफी देण्यांत येऊन बाकीच्यास जन्म ठेपेची शिक्षा मिळाली.

पळशी येथील डाक्यांतील आरोपी दा. जीबा यांस दहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली. तोंडगांव डाक्यांतील ३ आरोपी पैकी एकास जन्मठेपेची बाकीच्या दोघा पैकी एकास १० व दुसऱ्यास ७ वर्षांची सक्तमजुरीची सजा देण्यांत आली.

चिरणी मलकापूर येथील गणू पाटील याचे खुनाचे मुकदम्यास ता० १३ पासून सुरवात झाली ह्या खटल्यांत १६ आरोपी व १७९ साक्षीदार आहेत फिर्यादीतर्फे रा. रा. दुधोळकर बी. ए. एल. एल. बी हे वकील आहेत व प्रासिक्युन तर्फे मि. सुळे आ० ए. अ. क. आहेत व आरोपी तर्फे मि० पांडुरंग गोविंद वकील व मि० भागवत बी. ए. एल. एल. बी हे आहेत.

राष्ट्रीय सभेचे जनक मि० ए० ओ ह्यूम साहेब हे ता० २२ रोजीं नागपूर येथें येऊन दाखल होतील तेथून उमरावतीस त्यांचा मुक्काम लवकरच होणार आहे. दोन्ही स्थली, ह्या त्यांचा बहुमान व आदरातिथ्य करण्याकरितां जारीनें खटपट सुरू आहे. मे. ह्युम साहेब यांचे हिंदुस्थानांत हे शेवटलेच वर्ष आहे कारण ते येत्या लाहोर येथील राष्ट्रीय सभेनंतर जनरल सेक्रेटरीचे जागेचा राजिनामा देणार आहेत करितां या प्रसंगी आमचे राष्ट्रीय सभेचे भक्त मे ह्युम साहेब यांस आपली कृतज्ञता दाखविण्याची ही अमोलिक संधी दवडणार नाहींत अशी आमची खातरी आहे.

निजाम सरकार लवकरच आपले प्रधान मंडलांत फेरफार करणार आहेत.

सर अस्मॉन जहा निजाम सरकारचे मुख्य दिवाण यांस सहा महिन्याची आजारीपणाची रजा देण्यांत येऊन त्यांचे जागीं नबाब विकार उल उमाराव बहादुर याची नेमणूक करण्यांत आली.

### नोटीस.

मि० मुदरमल रामनाथ अगरवाले राहणार दहीगाव व दानापुर तालुके अकोट यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं सन १८९२।९३ एक साला करितां जिनचे कारखान्यास माणसें व बायका कामास देण्याचे कंट्राट तुम्ही व पारसीन मुसलमान मिळून घेतले व त्या प्रमाणें काम करितां तुमचे हिशाचे मजूरीचे रुपये [ ११८।१०६ ) जमा आहेत ते तुंम्ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत घेऊन जावे. पुढें तुंम्हांस पैसा मिळणार नाहीं. व फिर्याद तुंम्ही केल्यास त्या बद्दलचे जबाबदार आम्हीं कोणचे ही प्रकारचे नाहीं म्हणून ही नोटीस सही ता० १६ ११।९३ इ०

( सही )

गणेश विनायक मालक बनसिधर गणुलाल तर्फे मुकत्यार जानराव बाळकृष्ण राहणार दहीगाव

दस्तुर खुद.

### नोटीस.

मि. येको वलद गोठाजी पाटील राहणार पाथरडी तालुके अकोट यांस नोटीस देणार भिमी मर्द येको पाटील राहाण पाथरडी तालुके अकोट इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमच्याशी लग्न लाऊन आज सुमारें १४ वर्षे चवदा जाहली ह्या चवदा वर्षात मी शाहाणी होण्याच्या अगोदर चार वर्षे तुम्ही माझे सासर माहेर रितीप्रमाणें केलें. मी शाहाणी होऊन आज दहा वर्षे जाहली मी स्वतःहा तुमचे कडे आले परंतु तुंम्ही मी आल्यावर कोणच्या गांवीं निघुन गेलात ते तुम्ही सांगितले नाहीं व माझ्या पोटापाण्याची तजवीज ही केली नाहीं मी येकमहीना तुमचे करितां त्या वेळी हाल काढीले नंतर मी माझे मावशीच्या घरी आले तेथे मी अदमासे ९ नऊ वर्षे तुमचे नावावर कर्ज काढून राहिले व आता मा माझे मामेबहीणीचे घरी अदमासे येक वर्ष मी कर्ज तुमचे नांवावर काढून निर्वाह करित आहे. सदरील दाहा वर्षा मध्ये तुम्हांस दोनच्यार वेळ बोलाऊन आणून जाती रिती प्रमाणें तूंम्ही मजला घेऊन संसार करावा या बद्दल तुमची कबुली दादा भाउजी ब्राम्हण राहणार जळंब याणी व रायसिग हरसिंग देशमुख मु० जळंब बाकर या उभयताना करून घेऊन मजला आपले कडे पाठविले. व स्वतः ही येक वेळ त्यानीं पोहचती केली परंतु तुम्ही बाहेरगावी मी घरी आल्यावर निघून गेला ते जवळ जवळ महीनाभर घरी आला नाहीं म्हणून मी निरुपाय होऊन पुन्हा माझे मावशीचे घरी येऊन राहीले नंतर काहीं दिवसानीं पुन्हा तुम्हास मजबद्दल मारुती बापुजी पाटील राहणार दादगाव याणी व ज्यानमहंमद वलद गुलमहंमद या उभयतांना मजला घेऊन जाऊन संसार तुम्ही करावा असे बऱ्याच प्रकारानें सांगितले तुम्ही त्या पाशी सर्व कबुल केलें व मजला घेऊन गेला व पुर्वी प्रमाणे मजला न कळविता परगांवी निघून तुम्ही गेला व मी उपाशी मरू लागले तेव्हा माझे मामेबहीणीचे घरी येऊन राहिली व तुमचेनावावर आज पावेतो कर्ज काढून माझा गुजारा केला कर्ज रुपये ५००पाचशे आज पावेतो जाहले आहेत आतां मजला कर्ज मिळत नाहीं. व तुम्ही कांहीं माझी अन्नवस्त्राबद्दल व राहण्यास जागा याज बद्दल तजविज करीत नाहीं माझा सर्व जन्म विनाकारण जात आहे, व मजला कोणच्याही प्रकारचें बायकोच्या जातीस जे संसाराचें वगैरे सुख तें ह्या वेळ पर्यंत काही इतकें नाहीं याज करितां नाइलाज होऊन तुम्हांस ही नोटीस दिली आहे तर नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांत मजला जे आज पर्यंत पोटाचे वगैरे कर्ज झालेलें रुपये ( ५०० ) पांचशे देऊन मजला जनरीती प्रमाणें नांदऊन संसार कराल अशी चार पंचाची खात्री करून घेऊन जावें असें झालें नाहीं तर मी सदरहू नोटीसीची मुदत संपल्यावर तुमची वाट न पाहता हीच सोडचिठ्ठी समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा कोणचेही प्रकारचा मजवर हक्क राहणार नाहीं. याज करितां तुम्हास मी ह्या नोटीसीनें अगाऊ कळविलें आहे. रीती प्रमाणें तुम्ही खावटीचे रुपये ( ५०० ) देऊन मजला रिती प्रमाणें नांदऊन संसार कराल तर मी तुमचे पाशीं राहण्यास तयार आहे नाही. तर मजला निराळा घरठाव निरुपायास्तव करणें भाग आहे. म्हणून दिली नोटीस सही. तारिख १८ माहे नोव्हेंबर सन १८९३ इ०

सहीची निशाणी.

सहीची निशाणी बांगडी भिमी मर्द एको पाटील राहणार पाथर्डी ता० आकोट इच्या हातची असे.

## आकोला बाजारभाव

हुंडीमुंबई दर्शनी १००८—
„ १५ दिवसाच्या मुदतीची ९९॥
सुवर्ण २५।।। रुपे ८९ आळशी १०३
गहू काठे ६५ बनशी ८०
जवारी ५१ चणे ६० सर्की ९
कापूस ४३ रुई ६० जीनची रुई ६२
मीठ ४८= तूप ८ तेल ५॥=

सट्याचे भाव.

जवारी वसंत १५ संवत १९४९ ४६।।।
गहू वैशाख शुद्ध १९४९ ६।८=
आळशी चैत्र शुद्ध १९४९ ९४।
रुई फाल्गुन शुद्ध १९४९ ५७।
सर्की वै. नवे सालची १९४९ •

## जाहिरात.


हे पाक पहा वाशिवाय ता. २६।१२।९१ इ. चे वैदर्भांत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

ह्या हेमंत ऋतूंत हिवाळ्यांत खाण्यानें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल; व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतीणीस व सर्व स्त्रियांस शक्ति देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. बाटेल यांनीं मागविल्यास आह्मी व्ह्याल्युपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

| | |
|---|---|
| १ सालममिश्रीपाक दर शेरा ( ८० तोळ्यास ) | किंमत ३ रु. |
| २ बदाम पाक | २॥ रु. |
| ३ सालममिश्री व बदाम प्रत २ | २ रु. |
| ४ सौभाग्यसुंठ | २ रु. |
| ५ कुष्मांड पाक | ५ रु. |
| ६ गोखरु पाक | ७ रु. |

७ प्रवाळ, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.


## वर्तमानसार

विजेनें स्वयंपाक—सेंटपाल क्लब नामक एका संस्थेंत विद्युदुष्णतेनेंच सर्व स्वयंपाक तयार करण्यांत येतो. ज्या पदार्थाला जितकी उष्णता पाहिजे तितकी उष्णता त्याला पोंचून, अनेक पदार्थ एककाली अल्पावकाशांत तयार व्हावे अशी योजना विजेच्या नवीन चुलीमध्यें केली आहे. ही चूल जवळ असली म्हणजे १०।२० पदार्थ एकदम शिजले जातात. आंचाऱ्याला पदार्थांची भांडी चुलीचे तोंडावर ठेवण्या उतरण्यापेक्षां अधिक कांहीं करावें लागत नाहीं. कोणत्या पदार्थास किती अंश उष्णता दिली म्हणजे तो पदार्थ शिजतो ह्या बद्दल टिप्पण मात्र जवळ असावें व त्या त्या अंशाची उष्णता त्या त्या पदार्थांचे भांड्याकडे लावून दिली म्हणजे नियमित वेळानें ते पदार्थ चुलीवरून उतरावे. अशी योजना प्रचारांत आल्यामुळें युरोप व अमेरिका या खंडातल्या मोठमोठ्या पथिकाश्रमांत स्वयंपाकक्रिया अत्यंत सुलभ आणि सहज झाली आहे.

मि. दादाभाई नौरोजी हे हिंदुस्थानांत येण्याकरतां चालू महिन्याच्या १७ व्या तारखेस विलायतेहून निघाले असतील.

निझामाच्या राज्यांत जे वडे वडे अमीर उमराव आहेत त्यांच्या मुलांस सक्तीनें विद्याशिक्षण देण्याचा कायदा करण्याचा निझामसरकारचा विचार चालू आहे. ही व्यवस्था कशी काय करावयाची वगैरे बद्दल विचार करून रपोट करण्याकरतां एक कमेटीही नेमली आहे.

रजपुतस्थानांत नवी चांदी येत आहे व त्यावरून रजपुतस्थानांतील संस्थानिकांच्या टांकशाळांतून चांदीचें नाणे पाडण्याचें काम चालू आहे असें होतें असें सांगून संस्थानचा हा असा प्रकार चालू असल्यास त्याचा परिणाम फार वाईट होण्याचा संभव आहे अशी इंग्रजलोकांची ओरड आहे.

अंबाला येथें जी लटकी लढाई व्हावयाची आहे त्याकरतां पतियाळा संस्थानच्या दोन पलटणी जावयाच्या असून झिंद, नाभा व कपुरथळा या संस्थानांतून प्रत्येकी एकेक पलटण जावयाची आहे.

सान्टान्डर येथून समजतें कीं, डिनामिट नांवाची नवीन तऱ्हेची भयंकर काडतुसें निघाली आहेत तीं ज्या आगबोटीवर भरलीं आहे अशा एका आगबोटींत आगीचा एक दम भडका होऊन मोठा प्रळय झाला. आगबोटीचा फडशा होऊन आंतील माणसें चेंडूसारखी उडुन समुद्रांत पडलीं, बंदरावरची कित्येक घरें जळून खाक झालीं व उतारूंनी भरलेली एक आगगाडी जात होती तिलाही इजा झाली आणि शेकडों माणसें ठार झालीं.

सानफ्रन्सिस्को व न्यु ऑर्लिन्स येथील टाकसाळींत चांदीचें नाणे पाडण्याची सुरुवात करावी व ते नाणे अमलात आणावें असा हुकूम झाल्याचें अमेरिकेची तार सांगत्ये.

हिशेबावरून एका जज्जाचें रोटिवाल्याशीं वाकडें पडलें. रोटीवाल्यानें जज्जावर जज्जाच्याच कोर्टात दावा केला. खटला कोर्टापुढें आला तेव्हां जज्ज एकीकडे झाला व दुसऱ्या माणसास खुर्चीवर बसवून जज्जावर खर्चासह हुकूमनामा झाला.

राशिया एक फार मोठें नवें लढाऊ गलबत बांधीत असून त्यांच्या खर्चाचा आदमास २९,००,००० रुपये असून त्याची लांबी ३७० फूट असून रुंदी ५० फूट होणार आहे. त्या आगबोटीवरचे एंजिन १०,००० घोड्यांच्या शक्तीचें आहे.

लीवरपूल व मांचेस्टर यांच्या दरम्यान होत असलेला कालवा पुरा झाला व त्यांत पाणी सोडण्यांत आलें.

अमेरिकेंत इजनेरी विद्येचा अभ्यास केलेल्या एका ग्रीक माणसाच्या मार्फत टर्कीच्या सुलतानाची राजधानी जी कान्स्टांटिनोपल तेथें विजेच्या दिव्यानें चांदण्यासारखें चांदणे पाडण्याचा इलाज चालू झाला आहे.

संजीवनीचा सरहद्द बातमीदार सांगतो कीं, ६२ लष्करी सोजीर खिलातकडे जात असता २९ लुटारू मुसलमानांनीं शरकरखिंडींत त्या सोजरांवर छापा घातला. मुसलमानांच्या हातांत मोदगे असून सोजरांच्या हातांत आपला बचाव करण्याकरतां तरवारी होत्या. उभयतांत सुमारें दोन तास कडक लढाई झाली व त्यांत तीन सोजीर घायाळ झाले व चोरट्यांपैकीं एकाचें एक बोट मात्र कापलें गेलें. अशा रीतीनें त्या २९ मुसलमानांनीं हातांतल्या नुसत्या सोट्यांनीं त्या तरवार बहादर ६२ सोजरांचा पराभव करून त्यांच्याजवळ होतें नव्हतें तें सर्व लुटून नेलें. ही गोष्ट सांगून सोटे चांगले कीं तरवार चांगली असें तो पत्रकर्ता विचारतो. ठा. अ.

कोईमतूरच्या जवळ मोठा अपघात होऊन १६ माणसें मेली व ३१ जखमी झाली.

निझाम सरकारच्या राज्यांत जहगीरदारांच्या मुलांच्या शिक्षणाबद्दल सरकार वाटाघाट करित आहे व बडोद्या प्रमाणें काहीं व्यवस्था करण्याचा निझाम सरकारचा हेतू आहे असें समजतें.

राशियांतून सैबेरियांत जाण्याकरितां सुमारें ४८,००० मनुष्यें आगष्ट अखेर निघाली असें समजतें.

इसाखेलच्या लुटींत २९ लक्ष रुपये मिळाले.

हिंदुस्थानांत डाक्टर लोकांची कांग्रेस भरविण्याची वाटाघाट चालली आहे.

दक्षिण हिंदुस्थानांत बेलारी जवळ एक सोन्याची खाण सांपडली आहे असें समजतें.

मूरलोकांच्या बरोबर लढण्याकरितां स्पनिश सरकारानें १ लक्ष फौज एकदम तयार केली आहे, व लढाई जबरदस्त होईल असा रंग दिसतो.

केप येथें माटेबल व इंग्लिश यांच्या मध्यें बरीच मारामारी चालली आहे.

जर्मनींत घोड्याचे मांस खाण्याचा फार सपाटा चालला आहे. गेल्यासालांस सुमारें १६१८३ घोडे जर्मनींत मारले गेले !! सु. प.

महमदाच्या थडग्यावर हिरे, निळमाणी, आणि लाल मिळून २०,००,००० पौंड किंमतीचें जवाहिर आहे.

१०६६ पासून इंग्लंड व फ्रान्स यांच्या मध्यें एकंदर २४ वेळां लढाया झाल्या. शेवटची लढाई १८०३ पासून १८१५ पर्यंत झाली. या एका लढाईत १२,००,००० माणसें मेलीं. करमणूक.

हैद्राबाद येथील तुरुंगांत झालेला दंगाः— गेल्याच्या मागच्या मंगळवारी हैद्राबाद येथें सेंटल जेल मध्यें दंगा झाला पुरुष व स्त्रिया मिळून ह्या तुरुंगांत ८०० जवळ कैद्यांची संख्या आहे. त्या पैकीं कित्येकांना शिजलेलें अन्न मिळत. तीस कैद्यांची सैंपाक करण्याच्या कामीं योजना केली होती, व ते इतर कैद्यांना नेमल्या प्रमाणें अन्न देत असत. पण कित्येक कैदी कच्चें अन्न घेत असत. सरकारानें असा हुकूम फर्माविला कीं, एकंदर कैद्याना शिजविलेलें अन्न द्यावें, कच्चें देऊं नये. त्या प्रमाणें तरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं कैद्यांना शिजविलेलें अन्न दिलें पण ते घेईनात. त्यांनीं धांदल करण्याचा विचार केला व विटांचे तुकडे गोळा करून त्यांच्या समोर येईल त्याला त्यांनीं मारण्याचा बेत केला. असा हा प्रकार १२ वाजतां सुरू होऊन साडेपांच वाजे पर्यंत चालला होता मध्यंतरी थोडीशी चकमक उडाली व तीच एकाचा बळी पडून सहा असामी जखमी झाले. तुरुंगाच्या दोन दरवाज्यावर ५०० कोतवाल व त्यांचे नाईक होते. साडेपांचवाला मि. गार्डन, सय्यद अहमद, डाक्टर, व कोतवाल हे हातांत दांडके घेऊन आंत शिरले. कोतवालांच्या नायकानें त्यांना आपापल्या जागीं जावयास सांगितल्या बरोबर त्यांनीं त्यांचे ऐकिलें व बिलकूल जबाब दिला नाहीं.

## THE MAHRATTA EMPIRE TO THE ZENITH OF IT'S GLORY.

" मराठ्यांच्या वैभवाचें पहिलें पुस्तक. "

रॉयल अष्टपत्री आकाराचें तीनशें पृष्ठाजवळ जवळ होणारें.

फारच लवकर छापून तयार होईल. यांत "पंतप्रधान बहादुर श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीपर्यंतची मराठ्यांची कच्ची हकीगत येणारी असून-वीरसिंह दत्ताजी शिंदे-वीरराय विश्वासराव आणि स्वामिनिष्ठ बालवीर जानकोजी शिंदे, त्याच प्रमाणें (तारीख ७ जानेवारी सन १७६१ हे दिवशीं ह्मणतात, त्या प्रमाणें मुळींच नाहीं, तारीख १४ जानेवारी सन १७६१ हे दिवशींच ) मराठे आणि अफगाण यांच्यामध्यें 'सोनपत आणि पाणिपत' मधील ' सामली आणि सिवेर' चे मैदानांत जी भयंकर लढाई झाली, अर्थात् जिच्या सारखी 'असत्याचें नसतें' आणि 'नसत्याचें असतें करून भयंकर प्रकारची उलथापालथ होण्यास प्रत्येक सहृदय वाचकाचे नत्राचे ं खळखळ टिपें पाडून अंतःकरण मडमडुन येण्यास कारण करणारी ' हिंदुस्थानचे इतिहासांत आजपर्यंत दुसरी कोणतीही लढाई झालेली नाहीं," तिचा 'मराठी-फारशी उर्दू इंग्रजी वगैरे कोणतेही भाषेतून आजपर्यंत कोणीही प्रसिद्ध न केलेला संगतवार माहितीचा वत्तांत येणारा आहे ' इतक्या ह्या आमच्या लिहिण्यावरून पुस्तकाचे महत्व सुज्ञ आणि रसिक वाचकांचे सहजीं ध्यानीं येईल. उलट डाकेवर आश्रय देणाऱ्या फक्त १००० जणाचीं नांवें पुस्तकांत छापलीं जाऊन त्यांस पुस्तकाची किंमत सारी तारीख ३० नोवेंबर सन १८९३ पर्यंत २॥ रु. पुढें ३ रु (बाहेर गांवीं टपाल हंशीलाबद्दल चार आणे निराळे पडून व्हाल्यूपेएबल खर्च अलाहिदा दोन आणे पडेलच ) अगाऊ पैसे पाठविण्याची जरूरी नाहीं. नांव गांव वगैरे पत्ता सुवाच्य अक्षरांनीं लिहिलेला असावा.

पांडुरंग विष्णु कुंटे व्यवस्थापक.
ऐतिहासिक ज्ञानप्रसारक मंडळी पुणें.

नोटीस.

रा. भवानी प्रसाद वल्लद रामचंद्र तिव्हारी जात ब्राह्मण राहणार मौजे निजामपूर परगणें अडगांव तालुका आकोट यासी नोटीस देणार खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे तीर्थरुप नामें रामचंद्र तिव्हारी यांचेजवळ मी रुपये सातहजार धरवर ठेविली होती तो पैसा तुमचे कडून मला घेणें आहे. सदरहू पैशाबद्दल मी मागणी करीत असतां तुह्मी देतों देतों ह्मणत गेलात. परंतु पैसा दिला नाहीं. करितां ह्या नोटीशीनें तुह्मास कळविण्यांत येतें कीं - नोटिशीचे तारखे पासून आठ दिवसांत सात हजार रु. रक्कम मला देऊन माझी पावती घ्यावी असें न केल्यास नोटिशीचे खर्च सुद्धां तुमचेवर दावा करणें भाग होईल व दाव्याच्या संबंधांत जो मला खर्च करावा लागेल तो खर्च तुह्मास द्यावा लागेल करितां नोटिशींत लिहीले मुदतींत अदाई करावी. कळावें. ता० १९।११।९३ इ०

सही.
रुंजाजी वा॥ पुंजाजी पाटील
राहणार मौजे निजामपूर
दस्तुर खुद्द

अमूल्य ऐतिहासिक ग्रंथ.
सुप्रसिद्ध व अतुल पराक्रमी

## झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब ह्यांचें चरित्र.

( दोन सुंदर तसबिरीसह )

सन १८५७ च्या बंडामध्यें सर ह्यू रोज सारख्या युद्धकलाविशारद सेनापतीस व अखिल इंग्रज सैन्यास पराक्रम गुणानें थक्क करून सोडल्यामुळें सर्व जगास श्रुत झालेल्या झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाई साहेब ह्यांचें मनोरम चरित्र खुद्द त्यांचे दत्तकपुत्र श्रीमंत दामोदरराव व मातुश्री चिमाबाई साहेब ह्यांच्याकडून व रा० ब० चिंतामण वैद्य, मि० डिग्बी सी. आय. इ. इत्यादिनेक सद्गृहस्थांच्या मदतीनें साधार व विश्वसनीय माहिती मिळवून लिहिलें आहे. ह्यांत सर जान के, माल्लिसन, डा० लो, इव्हान्स बेल, व चार्लस म्याकफर्सन इत्यादि अनेक इंग्रज इतिहासकारांच्या लेखांचाही योग्य उपयोग केला आहे. त्यामुळें हें पुस्तक फार महत्त्वाचें व अत्यंत मनोरंजक झालें आहे. राणी साहेबांचें बाळपणापासूनचें एकंदर साद्यंत चरित्र, झांशी संस्थान लार्ड डलहौसीनीं खालसा केलें तो वृतांत व पुढें बंड होऊन झांशी, काल्पी, ग्वाल्हेर इत्यादि ठिकाणीं झालेले घनघोर संग्राम व त्यांत व्यक्त झालेले राणी साहेबांचें अद्वितीय शौर्य इत्यादि गोष्टींचा खरा इतिहास ह्या पुस्तकामध्यें फार चटकदार रीतीनें विस्तारपणें लिहिला गेला आहे. पुस्तकाच्या शेवटीं राणीसाहेबांचा हृदयद्रावक मृत्यु व श्री० दामोदररावांचा करुणरसपूरित जीवन वृतांत जो दिला आहे तो वाचून ज्याच्या डोळ्यांतून अश्रुपात होणार नाहीं असा मनुष्य विरळा मराठी भाषेमध्यें अद्वितीय स्त्रीचा, दुर्मीळ ऐतिहासिक माहितीनें परिप्लुत असा हा पहिलाच चरित्र ग्रंथ आहे. हा ग्रंथ 'निर्णयसागर' मध्यें छापत असून डिसेंबरमध्ये तयार होईल. बारीक टाइपाचीं पृष्ठें ३०० पेक्षां जास्त होतील. पुस्तकाची किंमत साधें बायंडिंग २ रुपये व कापडी बायंडिंग व सोनेरी नांव २॥ रुपये. टपाल व व्हा. पे. चा खर्च निराळा पडेल. सदर मुदतीपुढें घेणारास किंमत जास्त पडेल.

विशेष फायदाः— नाव्हेंबरपर्यंत ह्या चरित्रास जे आश्रय देतील त्यांस लोकप्रिय झालेलें व विद्वानांनीं नावाजलेलें सुंदर मासिक पुस्तक महाराष्ट्र कोकिळ एक वर्षभर निम्म्या किंमतीस ह्मणजे टपालहशिलासह ०॥१ आण्यास मिळेल. ग्राहकांनीं नांवें त्वरित पाठवावीं.

पत्ता.— रा० रा० व्यवस्थापक महाराष्ट्र कोकिळ सातारा.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर ,, ७ ,, ८

किरकोळ अंकास ....................८४

Six monthly............3 ,, 8 as.

Single copy...........................4 as

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।०६

दुसरे खेपेस .......०।

Advertisement

Below 10 lines...2 Rs

per line over 10... 4 as

Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVII AKOLA MONDAY 27 NOVEMBER 1893 NO 46

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २७ माहे नवंबर सन १८९३ इ० अंक ४६



## जाहिरात.

सर्व लोकांस जाहिर करण्यात येतें कीं शिंदखेड ता. मेहकर जि. बुलढाणें येथें राहणारा रावजी वल्द राणोजी तेली व आम्ही सखेबंधू असून त्यांच्या जवळ असलेले सर्व प्रकारच्या स्थावर जंगम जिनगींत आमचा निमे हिस्सा आहे. यांच्याशीं सर्व प्रकारें व्यवहार करणें तो यांच्या निमे जिनगीपुरताच आधारें करावा. यांच्या जवळून वरील जिनगी सर्व फरोक्त व गहाण घेऊं नये. घेणें असल्यास आमचा निमे हिस्सा वजा जाता घ्यावा ही जाहिरात दिली. ता. १५।११।९३ इ०

(सही.)

लक्ष्मण वल्द राणोजी तेली राहणार अंजनी खुर्द दस्तुर यमाजी लक्ष्मण तेली.

अमूल्य ऐतिहासिक ग्रंथ.

सुप्रसिद्ध व अतुल पराक्रमी

### झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब ह्यांचें चरित्र.

(दोन सुंदर तसबिरीसह)

सन १८५७ च्या बंडामध्यें सर ह्यू रोज सारख्या युद्धकलाविशारद सेनापतीस व अखिल इंग्रज सैन्यास पराक्रम गुणानें थक्क करून सोडल्यामुळें सर्व जगांत श्रुत झालेल्या झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाई साहेब ह्यांचें मनोरम चरित्र खुद्द त्यांचे दत्तपुत्र श्रीमंत दामोदरराव व मातुश्री चिमाबाई साहेब ह्यांच्याकडून व रा० ब० चिंतामण वैद्य, मि० डिग्बी सी. आय. इ. इत्यादिकांच्या सद्गृहस्थांच्या मदतीनें आधार व विश्वसनीय माहिती मिळवून लिहिलें आहे. ह्यांत सर जान के, मालिसन, डा० लो, इव्हान्स बेल, व चार्लस म्याकफर्सन इत्यादि अनेक इंग्रज इतिहासकारांच्या लेखांचाही योग्य उपयोग केला आहे. त्यामुळें हें पुस्तक फार महत्वाचें व अत्यंत मनोरंजक झालें आहे. राणी साहेबांचें बाळपणापासूनचें एकंदर साद्यंत चरित्र, झांशी संस्थान लार्ड डलहौसीनीं खालसा केलें तो वृतांत व पुढें बंड होऊन झांशी, काल्पी, ग्वाल्हेर इत्यादि ठिकाणीं झालेले घनघोर संग्राम व त्यांत व्यक्त ... राणी साहेबांचें अद्वितीय शौर्य इत्यादि गोष्टींचा खरा इतिहास ह्या पुस्तकामध्यें फार चटकदार रीतीनें विस्तारपूर्वक लिहिला गेला आहे पुस्तकाच्या शेवटीं राणीसाहेबांचा हृदयद्रावक मृत्यु व श्री० दामोदररावांचा करुणरसपुरित जीवन वृतांत जो दिला आहे तो वाचून ज्याच्या डोळ्यांतून अश्रुपात होणार नाहीं असा मनुष्य विरळा मराठी भाषेमध्यें अद्वितीय स्त्रीचा, दुर्मीळ ऐतिहासिक माहितीनें परिप्लुत असा हा पहिलाच चरित्र ग्रंथ आहे. हा ग्रंथ 'निर्णयसागर' मध्यें छापत असून डिसेंबरमध्यें तयार होईल. बारीक टाइपाचीं पृष्ठें ३०० पेक्षां जास्त होतील. पुस्तकाची किंमत साधें बायंडिंग २ रुपये व कापडी बायंडिंग व सोनेरी नांव २॥ रुपये. टपाल व व्ही. पे. चा खर्च निराळा पडेल. सदर मुदतीपुढें घेणारास किंमत जास्त पडेल.

विशेष फायदाः— नोव्हेंबरपर्यंत ह्या चरित्रास जे आश्रय देतील त्यांस लोकप्रिय झालेलें व विद्वानांनीं नावाजलेलें सुंदर मासिक पुस्तक महाराष्ट्र कोकिळ एक वर्षभर निम्या किंमतींत ह्मणजे टपाल हशिलासह ०।११ आण्यास मिळेल. ग्राहकांनीं नांवें त्वरित पाठवावीं.

पत्ता.— रा० रा० म्यानेजर महाराष्ट्र कोकिळ सातारा.



वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ४ शके १८१५

## गर्भस्थ अर्भक.

आज ज्या विषयावर आह्मी लिहिणार आहों तो अतिशय महत्वाचा असून सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे. असे विषय विलक्षण वादग्रस्त असून त्यांचा समाधानकारक आणि विश्वसनीय असा निकाल अलीकडे लागत चालला आहे. असे विषय कांहीं जाड्या इंग्रजींत विद्वान ह्मण्यांसच आपले रुचिवैचित्र्यामुळें नवेसें वाटणार नाहींत. परंतु बतावाताच्या शिकलेल्यांस व निवळ मराठी अगर दुसऱ्या एखाद्या देशीभाषेतरच ज्यांचे परिश्रम झाले असतील त्यांस हा विषय नुसता बोधपर होईल, असें नाहीं तर आमचे पाच्या योगानें मनोरंजनही होईल. शिवाय नवैचित्र्यामुळें ज्या कोणास एखादा विषय आवडणार नाहीं तो सार्वत्रिक अप्रीय होईल असें आह्मांस वाटत नाहीं.

गर्भस्थ मनवी प्राण्याची मानसीक आणि शारिरिक रचना अनेक प्रसंगीं किती चमत्कारिक असते ! कोणत्या कारणांवरून कोणते निवसांत फेरबदल होतात याची आपण शेंकडोंशें उदाहरणें अनेक प्रसंगीं साधारण माणसांच्या आणि वैद्य लोकांच्या मुखानें एकून आश्चर्य चकीत होतों. हीं उदाहरणें एकतांनां आपण कधींही कार्यकारण भावानें या फरकांचा विचार करीत नाहीं. तो आज करण्याचें आह्मी योजीत आहों.

प्रत्येक विचारी पुरुषास योग्य परीक्षण व विचार करण्याचें सामर्थ्य ईश्वरानें दिलें असतां ज्या ढोबळ गोष्टी उघड उघड दिसतात त्याच आह्मी जितक्या थोडक्यांत आमच्यानें देववतील तितक्या थोडक्यांत देऊन त्यांच्या समर्थनास थोडथोडीं अनेकांतून पसंत करून उदाहरणें देण्याचा आमचा विचार आहे. हीं उदाहरणें आह्मी आमच्या पदरचीं देत नसून दीड हळकुंडावर पिवळे झालेल्या व अर्धब्रह्म ह्मणवून घेणाऱ्या अगर समजणाऱ्या व तशा समजुतींत कोणी आडवे आल्यास गालीदान करणाऱ्यांच्या तोंडचींही नाहींत. नाना फडनवीसांच्या केंक दंतकथा मराठी भाषेंत बिरबल बादशाहाच्या गोष्टी प्रमाणें चालूं होऊं पहात आहेत अशांतील नसून साधारण इंग्रजी ग्रंथकारांच्या पुस्तकांतूनही घेतलेलीं नाहींत. परंतु अतिशय माननीय ग्रंथकारांच्या पुस्तकांतलिच शेंकडोंशें उदाहरणांपैकीं अनेकां प्रमाणेंच एक दोनही उपयुक्त समजून तितक्याच उदाहरणांवर आह्मी आमच्या वाचकांचें काम भागवूं.

पहिला नियम— मुलांचें शरीर व त्यांची मानसिक रचना हीं थोड्या जास्त प्रमाणानें उभयतां माता पित्रांच्या शरीरा प्रमाणें अगर मानसिक अवस्थे प्रमाणें आढळतात.

दुसरा नियम— कधीं मूल एकट्या आई प्रमाणें अगर एकट्या बापाप्रमाणेंच आढळण्यांत येतें.

तिसरा नियम— कधीं मूल उभय जनकां पासून अगदीं भिन्न असतें. तें एखाद्या शेजाऱ्या प्रमाणें अगर परस्था प्रमाणें इतकें हुबेहुब असतें कीं बिचाऱ्या मातेच्या पातिव्रत्या बद्दल देखील वारंवार संशय उत्पन्न होतो. कधीं कधीं एखाद्या चित्रार्पित अगर लेखार्पित किंवा नेहमींच्या भाषण-विषय-चरित्र न्यस्तमुत थोर पुरुषा प्रमाणें असतें. व कधीं कधीं स्वप्नांतील भयंकर आकृती प्रमाणें ही आढळून येतें.

चवथा नियम— पुनर्विवाहाचा प्रचार ब्राह्मण जातींत तर नाहींच. परंतु ज्या अन्य हिंदु जातींत आहे त्यांतील स्त्री पुरुषवर्ग अद्याप मानसिक उन्नतीच्या नीच स्थितींत आहे कीं त्या वर्गावरून आह्मास या चवथ्या नियमाचें समर्थन करणें फार जड पडेल. तरी ज्या सुधारलेल्या अन्य जातींत हा प्रवात सुरुं आहे त्या जातींतील उदाहरणां वरून असें दिसतें कीं पुनरूढा ढेत स्त्रीचें मूल मानसीक स्थितीनें व शरीररचनेनें हुबेहुब पूर्वपतीचीच प्रतिकृति असते. ज्या स्त्रियां बलात्कारानें एखाद्या नराधम परपुरुषाच्या जाळ्यांत एकादे प्रसंगीं सांपडल्या असतात अशांचीं मुलें तर हटकून आपल्या खऱ्या जनकांचे गुण न घेतां, त्या नराधमाचे सर्व गुण घेऊन जन्मतात !

पांचवा नियम— स्त्री गरोदर असतां कधीं कधीं भिऊन जाते; कधीं कधीं अनर्थपातानें कचरून जाते; कधीं कधीं भयंकर अगर दुःखदायक प्रसंगानें किंवा लुंग्या सुंग्याच्या दृष्टीनें घाबरून जाते. असें झाल्यास पुढें होणारें मूल मनानें व शरीरानें व्याधिग्रस्त होतें व कधीं कधीं तें अशा व्यंग माणसा प्रमाणें ही होतें.

वरील पांची नियमांचा थोडा फार अनुभव प्रत्येक विचारी मनुष्यास जरूर आलेला असलाच पाहिजे. तरी त्या पैकीं पुढील तीन नियमांचीं थोडीं उदाहरणें देऊन हे प्रकार कसे घडवात याचा थोडक्यांतच विचार करूं.

आमच्या वाचकांनां आमच्या पहिल्या दोन सिद्धांतांचीं त्यांच्या आसपास शेंकडोंशें प्रत्यक्ष उदाहरणें आढळतील व आढळलीं असतील ही सबब तीं देऊन आह्मी कालक्षेप व स्थलक्षय करीत नाहीं.

तिसऱ्या सिद्धांताच्या समर्थनास डा. डेवीस यांनीं दिलेल्या अनेक उदाहरणांपैकीं दोन फारच मनोवेधक उदाहरणें आह्मी देतों:—

पहिलें— "आपल्या लष्करी खात्यांतील शूर पतीबरोबर एक बरीच धीट स्त्री घोड्यावर बसून जात असे. लढाई करतां शिकविले जाणाऱ्या शिपायांस ती नेहमीं पहात असे, तेथील मनोत्साह वाढविणाऱ्या देखाव्यानें व गायनानें तिच्यांत लढाया पहाण्याची व विजय मिळविण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली. ही गोष्ट तिचा मुलगा प्रसिद्ध नेपोलिअन बोनापार्ट हा तिच्या उदरीं जन्मण्याच्या कांहीं महिने अगोदर घडली! नेपोलिअन हा आपल्या उभय पित्रां पेक्षा किती भिन्न होता हे जगप्रसिद्धच आहे!"

"प्रसिद्ध कवी डॅन्टि हा जन्मण्याच्या पूर्वीं त्याच्या जननीस एक अद्भुत आणि अमानुष देखावा दिसला. पृथ्वीच्यावर अथांतरी आकाशाच्या आणि पृथ्वीच्या मध्यांतरावर समुद्रांतून विस्तीर्ण व व्यवस्थीत लोक वस्तीचा प्रदेश निघून तेथें आकाश्मित झालेला तिनें पाहिला. या प्रदेशांत सर्व सृष्टिजन्य व कृत्रिम सौंदर्य आहे असें तिला दिसलें. एका उंच आणि भव्य पर्वतावर आपला हात उभारून कोणी आपणास वरील प्रदेश दाखवीत आहे व तो आपला मुलगाच आहे असें तिला वाटलें. या मायादृष्टीनें ती इतकी चकित झाली कीं ती कांहीं वेळ बेशुद्ध पडली. अर्धवट शुद्धीवर आल्यावर आपला मुलगा तोच देखावा आपणास दाखवीत आहे असें तिला वाटलें. या वेळीं तिचें सर्व भय विप पळून गेलें व ती पहात होती. नंतर प्रसूत होई पर्यंत डॅन्टीच्या आईस पुढील मुलाच्या मोठेपण बद्दल एक सारखे विचार सुचत होते. याचा परिणाम हा झाला कीं मातापितृभिन्न स्वरूपाचा व बुद्धीचा

सर्व सुधारलेल्या राष्ट्रांस आपल्या अपूर्व कविनिर्मितो मोहून टाकणारा विधात्या प्रमाणें किंवा त्या पेक्षांही श्रेष्ठ काल्पनिक प्रतिसृष्टि निर्माण करणारा असा महा कवी हॅन्टी हा जन्म पावला!

आपल्या पूर्वजांनाही हा सिद्धांत पूर्णपणें अवगत होता असें दिसतें कारण पुराणांतो चक्रव्यूह भेदनाचें ज्ञान अर्जुनास श्रीकृष्ण सांगत असतां जवळच गर्भवती सुभद्रा होती. अर्जुनास ज्ञान प्राप्ति होत असतां गर्भस्थ अभिमन्यूनें हुंकार दिला! ही गोष्ट खरी असो अगर खोटी असो इतकें तरी सिद्ध आहे कीं अलीकडे सुधारणेच्या आग्रस्थानांवर पोहोंचलेल्या राष्ट्रांस जे सिद्धांत आतां आढळून येत आहेत ते एका काली आमच्या देशांत पूर्ण अवगत होते. यावरून ह्मणजे हल्लीं आह्मी तसेंच कायमचे सुधारलेले आहोत अगर गतवैभवानें तृप्त राहून स्वस्थ बसावें असें आमचें ह्मणणें मुळींच नाहीं. आह्मी हल्लीं इतके पतीत झालों आहों कीं खरी प्रिती खरी भूतदया, खरी न्यायबुद्धि, अन्यदर्शित दोषमान्यता, व तदनुरुप स्वसुधारणेच्छा, शत्रूचाही विनाकारण नाश होत असतां त्या बद्दल हळहळ वाटणें, आपला दुराग्रह सोडून दुसऱ्यानें योग्य व हितावह बुद्धिवाद केला असतां पक्षाभिमान सोडून उदार बुद्धीनें त्याचें ग्रहण करणें इत्यादि गुण जे खऱ्या सुधारणेचें मूळ व ज्याचें खरी सुधारणा मूळ, त्यांचा आपणांत पूर्ण लोभ झाला आहे इतकेंच नाहीं तर त्याचा उलट सन्मार्ग दर्शकांची छळणूक करण्यासही कांहीं देशभक्त प्रसंगी तयार होतील असेंही लोक आहेत! ही मोठी खेदकारक गोष्ट आहे! परंतु हिचें उन्मूलन होईल तोच सुदिन. सुश्रवणानें संस्कृत होऊन असाधारण गोष्टींचा ज्यांच्या मनावर सुपरिणाम घडतो इतकें गुणग्राहीत्व ज्यांच्यांत आले आहे अशा स्त्रिया व वरील गुणांचे सुपुरुष इतकें या देशांत जन्मू लागल्यावर सुधारणा, सुधारणा, ती काय? स्वातंत्र्य तें काच? या प्रसंगीं विषयांतर झालेंच आहे तरी मिल्टन व बायरन यांचे दोन उतारे घेऊन हा तिसरा सिद्धांत संपवितो.—

"The mind its own resting place and Can make hell of heaven and heaven of hell."
Milton

"Snatch from the ashes of your Sires The embers of their living fire.
Byron.

पहिल्या मिल्टनच्या उताऱ्याचें भाषांतर "मन हेंच मनुष्याच्या बंध विमोचनाचें कारण. मनाच्या योगानेंच स्वर्गवासही नर्कवासा प्रमाणें दुःसह होतो आणि नरकवास स्वर्गवासाप्रमाणें सुखावह होतो."

दुसऱ्या बायनरच्या उताऱ्याचें भाषांतर;— "पूर्वजांच्या अद्याप दहन होत असणाऱ्या अग्निस्फुलिंगावरून त्यांच्या पूर्वींच्या अंगगत अग्नीस चेतवा ह्मणजे "त्यांच्या महत्कृत्यांवरून त्यांची थोरवी संपादन करा."

चवथ्या नियमाच्या समर्थना करितां रेव. चार्लस मॅक कोम्बी यांनीं दिलेलें उदाहरण घेतो;— "माझ्या शेजारच्या एका गत भर्तृकेस पूर्व पती पासून पांच मुलें झाली. पाति वारल्यावर दुसऱ्या पासून तीन झालीं. पहिल्या पतींत व दुसऱ्या पतींत रुपाचें आणि स्वभावाचें विलक्षण अंतर असतां या बाईस एक मुलगी हुबेहुब पूर्व पती प्रमाणें झाली आहे!"

अमेरिकेंतील डाक्तर अईस यांस एकदां असें आढळून आलें कीं एका कोळसावळ्या मुलेट्टो जातीच्या बाईस गोर कायस्था पासून आणि आपल्या जातीच्या पती पासून संतती झाली. परंतु गोर कायस्था पासून झालेली मुलगी हुबेहुब पूर्व मुलेटो पासून झालेल्या संतती प्रमाणें आहे.

पांचव्या सिद्धांताच्या समर्थनार्थी दोनच उदाहरणें देऊन हा लांबलेला लेख अह्मी पुरा करून पुढील अंकी हे प्रकार दृष्टोत्पत्तीस कां येतात याची कारणें देऊं.

पांचव्या सिद्धांताच्या पुष्टिकरणार्थ डाक्तर पानकोस्ट यांनीं दिलेल्या उदाहरणां पैकीं कांहीं देतोः—

उरसिनी नामक घराण्यांतील एका गरोदर स्त्रीनें आपल्या घरांत टांगून ठेवलेल्या आस्वलांच्या चित्रकलिका व चित्रस्तंभ वारंवार पाहिले. पुढें मूल झालें त्यास आस्वलाचे पंजे होते व आंगावर सर्व आस्वलांचेच केसही होते!

"एका स्त्रीस गरोदरपणीं समुद्रांतील खेंकडे खाण्याचीच इच्छा झाली. पुढें तिला मूल झालें तेंही त्या त्या प्राण्या प्रमाणेंच होतें!"

स्काल्पेल नांवाच्या पुस्तकाचे चालक डा. डिक्सन यांनीं एक मजदार गोष्ट लिहिली आहे ती देऊन आम्ही आजचा लेख पुरा करितो.

"न्युयार्क संस्थानच्या उत्तरेस रहाणाऱ्या एका गृहस्थास ओढघस्त स्थिती मुळें सुमारें चाळीस वर्षे पर्यंत लग्न करून हा मुलाचा बोजा आपणास झेपणार नाहीं असें वाटत होते, पुढें स्त्री गरोदर राहिली. तिला हें समजल्यावर फार वाईट वाटलें. अर्थातच पतीच्या दुःखकारक स्थितीस पाहून दुःख न वाटणारी स्त्री भार्या नसून त्राटीकाच मानली पाहिजे. नवऱ्यास तिनें ही गोष्ट कळविली. हे ऐकताच तो सपाट्यानें बाहेर निघून गेला स्त्रीस तो खिन्न झाला असें वाटून ती अतिशय कष्टी झाली. घरी आल्यावर गृहस्थानें आपल्या बायकोचे पुष्कळ समाधान केलें व तिला सांगितलें कीं "मी अतिआनंदानें बाहेर गेलो. माझ्यानें आनंदामुळें बोलवेना. आपले उत्पन्न आतां वाढले आहे हे तुला माहीतच आहे. मला मुल म्हातारपणाच्या विसाव्या करतां पाहिजेच होतें" या सांगण्यानें बायकोस समाधान वाटलें. परंतु उपजलेले मूल कांहीं केल्या बापाजवळ जाईना हल्ली तो मुलगा मोठा बारिस्टर विलायतांत आहे तरी अद्याप त्याचें व त्याच्या बापाचें भाषण नाहीं! हा परिणाम गरोदर मातोश्रीच्या दहशतीचा।"

येथवर वरील पांच सिद्धांतांची उदाहरणें दिली. पुढील खेपेस असें प्रकार कां घडतात यांची कारणें देऊं.

---

आमचे पूर्वीचे अकांत दिलेल्या नोटीसी प्रमाणें मि० व्यंकटराव देसाई यांणीं येथील शहरचीफ कानस्टेबल व हेड कानस्टेबल यांजवर इ० पि० कोड कलम ३४२ प्रमाणें डि० माजिस्ट्रेट मि० हेअर साहेब यांज कडेस दाखल केलेल्या फिर्यादीची प्रथम चौकशी होऊन मे० हेअर साहेब यांणीं फिर्यादि फायलावर घेण्या विषयीं हुकूम देऊन आरोपीस व साक्षिदारास समन्स काढण्यांत येऊन ता० २४ रोजीं सदहु खटला पुन्हा निघाला फिर्यादी तर्फे काम चालविण्यास रा० रा० खापर्डे बी. ए. एल. एलबी हायकोर्ट वकील हे होते. खटला सुरू होतांच कोर्टा समोर उभयतां आरोपींनीं मि० देसाई यांची क्षमा मागितल्या वरून फिर्यादीचे वकीलांनीं सदहू फिर्याद काढून घेतली. एकंदरींत झालेला निकाल उत्तम झाला या फिर्यादी वरून पोलीस आक्टातील कलम ३४ चे पूर्ण स्पष्टी करण, लोकांच्या स्वातंत्र्याचा हक्क व पोलिस खात्यातील कनिष्ठ दर्जाचे नोकर आपले अधिकाराचा दुरुपयोग करितात हे स्पष्ट झाले आहे. कमी दर्जाच्या पोलिस नोकरांच्या हातात अधिकार त्यांचे धंद्याचे कामा करिता दिले जातात परंतु तो अधिकार ते पुष्कळ प्रसंगी जुलमाचा व त्रास दायक अशा रीतीनें बजावित असतात. प्रस्तुतचे उदाहरणा वरून पोलिसांनीं व ज्यांचे हातांत अधिकार आहेत अशा सरकारी नोकरांनीं आपल्या अधिकाराचा कशा रीतीनें उपयोग केला पाहिजे व जुलमा पासून कायदा प्रजेचे कोणत्या रीतीनें संरक्षण करितो हे लक्षांत ठेविले पाहिजे. या प्रसंगीं मि. देसाई यांचेही आपण फार आभार मानले पाहिजेत कारण त्यांनीं सदहु फिर्याद एवढ्या पल्या पर्यंत नेऊन पोंहाचवून स्वातंत्र्य कसे आहे कायद्याचा अर्थ कसा व पोलिसानें आपले अधिकार कसे चालवावे या बद्दल पोलिसास उत्तम धडा घालून देण्याचे श्रेय घेतले. एकंदरींत खटल्याच्या या रीतीनें निकाल झाला हे पाहून आह्मास उभयता पक्षकाराचे संबंधानें आनंद होत आहे व या पुढे असें प्रसंग न येतां. लोकांचे मनांतलि पोलिसा विषयींचे उत्पन्न होत असेल किल्मिष नाहिसें होईल असें आह्मी मनापासून ईच्छितो.

---

फारच उत्तमः— ज्या प्रमाणें ह्मैसूर संस्थानांत प्रातिनिधिकसभा स्थापन झाली आहे. त्या प्रमाणें आपल्याही राज्यांत असावी असें श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे मनांत आलें आहे. व त्या संबंधीं पुरी माहिती मिळविण्या करितां त्यांनीं आपल्या हायकोर्टचे सेकंड जडज्ज खान बहादूर करसपसजी रुस्तमजी दादा चांदजी यांस तिकडे पाठविले आहे. जसें हल्लीं ह्मैसूर संस्थानांतील लोक प्रातिनिधिक संस्थे पासून सुख भोगीत आहेत तसें बडोदे संस्थानांतील लोकांसही या पुढें मिळत जाईल. श्रीमंत सयाजीराव गायकवाड आपले प्रजेचे हिता कारितां इतके झटत आहेत. हें पाहून कोणास आनद होणार नाहीं बरें.— या प्रमाणें याच तोडीचे दुसरें संस्थान इंदूर येथें अशा संस्था स्थापन होतील तर तिकडील प्रजाजन श्री शिवाजी महाराज यांस फार दुवा देतील!

---

नवीन व्हॉइसरायचें अभय वचन— इस्ट इंडिया असोसियेशनच्या सभासदांनी ज्या वेळीं लार्ड एल्जिन साहेबांचीं लंदन शहरांत भेट घेतली त्या वेळीं एक अर्ज केला व अशी विनंती केली कीं करन्सी नाणे व सरहद्द वगैरे गोष्टींचा चांगला बिचार व्हावा. व्हॉइसराय साहेबांनीं उत्तर देतांना असें ह्मणून दाखविलें कीं सध्यां मला येथें ह्या प्रश्नाबद्दल कांहींच मत देतां येत नाहीं. हिंदुस्थानांत गेल्यावर ब्रिटिश लोक व नेटिव्ह लोक ह्या मध्यें जेणें करून सलोखा राहील त्या प्रमाणें मी वागेन.

---

हैद्राबाद येथील रोसिडेंट यांचा बंगला सुरंग लावून उडाविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल जवाद हुसेन नांवाच्या मनुष्यास पकडून त्याजवर खटला झाला आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER, 27, 1893

---

## MR. V. K. DESAI V. POLICE.

In one of our former issues we briefly noticed the circumstances which led the Town Police here to arrest Mr. Vyankatesh Krishna Desai of the local bar, at about 10-30P. M. on the 22nd. September 1893, on a charge of keeping his cart on the public road, punishable under Section 34 of Police act. When the case came on for hearing the next day before Mr. Walsh Extra Assistant Commissioner and Magistrate, Mr. Desai was acquitted on the statement of the Complainant himself, because, there was no allegation in it, which could by any stretch of meaning be made to show that Mr. Desai had committed either the offence charged or any other offence known to Law. After the termination of case in his favour, Mr. Desai, served notices on the District Superintendent of Police signifying his intention to commence both Criminal and Civil actions against the Chief and Head Constable, concerned in the arrest and subsequent proceedings for wrongful arrest and malicious prosecutions. The Complainant in the former was presented some time ago to the District Magistrate who thought it proper to hold a preliminary enquiry before issuing processes. Mr. Khaparde of the Amraoti Bar appeared to conduct it on the 17th. instant and after a somewhat lengthy hearing the necessary summonses were granted against both the accused. Thus the case came on the regular file and was fixed for the 24th. instant. On that day Mr. Khaparde again appeared for the prosecution and the accused were undefended. They applied for 24 hours adjournment to engage Council and this concession was granted them. When on the 25th. instant the case again came on for hearing, it transpired that the accused had in the meantime apologized, and the expression of regrets being accepted, the prosecution was withdrawn.

The result is very satisfactory. It has vindicated the law, upheld the secredness of personal liberty and in stilled the wholesome fear of recklessly using the powers given to public servants, into the minds of the subordinates of the Police Department. From the nature of their duties, they are entrusted with authority which by little, conscious or unconscious abuse, admits of being turned into a powerful engine for causing petty annoyances and even serious trouble in some cases. Society can not therefore be too jealous in watching the exercise of these powers,

and every instance of this kind serves the double purpose of teaching the public servants their proper place in the economy of the administration, and illustrates to every individual the protection provided for him by the law against unnecessary interference and oppression. Mr. VyankatRao Desai, has in fighting for his rights, done great service to the public, and the mercy shown by him in letting the offenders against his own person go on seeing their repentance gives a graceful ending to his just efforts. It is truly justice tempered with considerations of mercy, and exalts his character. We congratulate him and his late opponents on the happ"finale" and sincerely trust that similar occurrences will not happen again to disturb the public mind.

## VILLAGE LIFE IN INDIA.

**Lecture by Sir W. Wedderburn, M. P.**

On October 18th, Sir W Wedderburn delivered a lecture at Keith, Banffshire, on "Village Life in India." He said that he had chosen the subject of village life because he considered that it lay at the foundation of the whole condition of the people. There had long existed two popular fallacies with regard to India. One was that India was a rich country. The "wealth of India" had been proverbial long before the time of Milton, and it was true that India possessed great possibilities of wealth. But her resources were undeveloped, and her vast population of 280 millions were for the most part in a state of the most extreme poverty. Their average income was only three-halfpence a day, and they had no savings in money or grain, so that a single failure in the periodical rains caused a famine, and led to countless deaths by starvation. The other fallacy was that it was impossible for the general public of Great Britain to understand Indian affairs. It was said that races castes, and religions differed so much in different parts of India that no one except official experts could form an opinion regarding their condition and requirements. But this was altogether a mistke. The great bulk of the population were peasant cultivators, grouped together in small village communities like rural parishes, and their economic conditions were very much the same throughout India. Each village community was self-governing and self-contained. The problem, therefore, was not so very difficult. It was how to make one village consented and prosperous, and we then should have the clue to the well—being of the whole of India. In order to understand the nature of the village community, it was necessary to bear in mind two facts—First that its origin was purely agricultural, the central idea being the ownership of the village land; and secondly, that in its construction the Indian village was simply an expansion of the domestic unit—the united Hindu family—the members of which were united under the management of the father, owning and cultivating the ancestral lands in common, Manu, the great Indian law giver, said that the land belonged to him who first cleared away the jungle and brought the soil under cultivation. When, therefore, a man and his sons had performed this operation and enclosed a site for their own dwelling and the shrine of the family divinity, the foundations of a village had been laid. As the numbers increased and the sons had families of their own, the representative of the founder, under the title of patel, remained hereditary head of the village, exercising the executive power, while the real authority rested with the village Assembly, of which all the head of households were members. As regarded the organising of the village, the patel, or head man, was assisted by a hereditary accountant, generally a Brahmin, who kept the village books and under the orders of these two functionaries there was a certain number of village servants who carried out the administration in its various branches, collecting the Government land tax, maintaining order, managing the communal pastures and forests, resulating the distribution of water from the irrigation tanks, and keeping the village clean. In India there was no poor law, as each family and village voluntarily maintained its own poor. Village officers and servants received in payment for their services a certain share of grain at harvest time, and the same mode of payment extended to the hereditary village artisans—the carpenter, the blacksmith, the weaver, the potter, the shoemaker, the barbour, the washerman, and so forth, each of whom performed his professional duties for the benefit of the villagers, and received dues in kind, according to the ancient local custom. These hereditary artisans formed a guild in each village and besides their ordinary services had an important part to play in the ceremonia at marriage and other festivities under the leadership of the car penter, who was head of the guild Sir W. Wedderburn referred to the modes of cultivation followed in India, describing the great skill of the peasant cultivators, who produced the finest quality of valuable products such as indigo, rice, opium, cotton, jute, tea, tobacco, and coffee. Unfortunately, they had fallen terribly into debt to the money lenders. Debt paralysed their industry, and their ancestral acres were sold by decrees of the Courts. Upon an average they had to pay the money—lenders twenty—four per cent. per annum. What was most needed was a system of agricultural banks which would give them loans on reasonable terms. At present India only took 1s. 6d. per head of British manufactures on account of the extreme poverty of the people. If they could take 20s. per head, our trade with India would be equal to our trade with the whole of the rest of the world put together, to the great advantage of the toiling masses both in India and in this country. The way to make India prosperous was to take care of the villages. Sir James Caird, who went to India on the Famine Commission, called the village organisation " the sheet anchor of Indian statecraft."

The Berar Educational Conference was, as previously announced held at Amraoti on the 22nd. instant. It continued its sittings up to the 25th. The proceedings were as usual concluded by the Director's speech.

## वऱ्हाड.

हवामानः— गेले सप्तकांत पर्जन्यं मुळींच पडला नाहीं तरी दिवसा आकाशांत ढग येऊन उष्मा होत असे परंतु दोन तीन दिवसा पासून आकाश निरभ्र होऊन रात्रीं चांदणे चांगले स्वच्छ पडून सकाळीस चांगली गुलाबी थंडी पडूं लागली आहे. रब्बीचे पीक उत्तम आहे.

मे० कुमार श्री हरभामजी रावजी असिस्टंट कमिशनर यास चार महिन्याची फर्लो रजा मिळाली त्या अवधीत ते कांहीं खासगी कामाकरितां विलायतेस गेले आहेत.

मे० बुलक साहेब जुडिशिपल कमिशनर हे ता० २३ रोजीं रजेवरून परत येऊन ते आपले कामाचा च्यार्ज घेतील. व मे० कर्नल स्पॅनस्की साहेब हे आपल्या बुलढाणें येथील डेप्युटी कमिशनरचे जागी परत जातील. व तेथील अ. डे. क. मे. कर्नल गनथार्प सा० हे विलायतेस रजेवर जाणार.

आहेत.

डाक्टर लिटल साहेब सानिटरी कमिशनर हे रजेवरून परत आले व उमरावतीस आपले कामाचा च्यार्ज घेण्यास रवाना झाले. डाक्टर स्वेन अ. सनिटरी कमिशनर हे मध्य प्रांतांत आपले कामी परत जातील.

मे० राईट साहेब डि. सु. पोलीस हे रजेवरून परत येऊन त्यांणीं इलिचपूर येथें आपले कामाचा च्यार्ज घेतला व तेथील अ. डि. सु. पोलिस मे. सुवेल साहेब यांस उमरावतीस असिस्टंट सु. पोलिसचे जागेवर बदलले.

हैदराबादचे खटल्यांत प्रसिद्धीस आलेले नवाब महदीहुसेन यांना भोपाळच्या बेगम साहेब आपले दिवाण करणार आहेत असे बूट बाहेर निघाले आहे.

येथील हायस्कूल प्रवेश परिक्षेचा निकाल ता० २१ रोजीं झाला ६९ विद्यार्थ्यां पैकीं ४८ पास झाले व ६ जणास वर घेण्यांत आले. पास झाले त्यांचा तपशीलः— आकोला ३१ पैकीं २८ चिखली ९ पैकीं ६ बाळापूर ७ पैकीं ५ देऊळगांवराजा ६ पैकीं ३ खामगांव १३ पैकीं ५ व शेगाव ३ पैकीं १.

मे. शोफर साहेब ए. अ. रेसिडेन्ट हैद्राबाद यांसही देवाज्ञा झाल्याचें दुःखकारक वर्तमान आलें आहे.

मे. शोफर साहेब यांच्या रिकाम्या झाले ल्या जागेवर पद्मावें कोणाची नेमणूक होते. आमचे मतें सदर्हू जागेस लायक असे गृहस्थ रा. रा. गणपतराव सहस्त्रबुद्धे बी. ए. ए. अ. कमिशनर व बरार सेक्रेटेरिएट ऑफिसचे हेड क्लार्क हे योग्य आहेत असें कोण ह्मणणार नाहीं. मे. क्लीडन साहेबें या वेळीं त्यांच्या हक्काचा विचार केल्यावांचून राहणार नाहींत अशी आमची पक्की खात्री आहे.

वऱ्हाड एजुकेशनल कानफरन्सचे कामास ता० २२ रोजीं सुरुवात होऊन ता० २५ रोजीं मामुली प्रमाणें मे० डायरेक्टर साहेब यांचे भाषण होऊन काम संपविण्यांत आले.

निजाम सरकारचे नवीन नेमलेले दिवाण बहादूर नवाब विकार उल् उमराव यांणीं आपल्या हाता खालील सर्व प्रधान मंडळीच्या खानगी भेटी घेऊन त्यांस कुशल विचारले व तसेच हैद्राबाद येथील जुनाट सर्व मान्य व लोकप्रीय असे सरसालरजंग यांचे घराणे आहे ज्यांत आतां फक्त एक साहा वर्षांचा मुलगा दुसरा सर सालरजंग नांवांचा आहे त्यांची भेट घेतली व त्यांचा समाचार घेतला या वरून सदर्हू दिवाण साहेब हे लवकरच हैद्राबाद दरबारात चालू असलेली धुमाकुळी मोडून टाकून परस्परांत प्रेमभाव व ऐक्यतां करून राज्याचा कारभार उत्तम रीतीनें चालावून प्रजाजनांचे पुष्कळ कल्पाण करतील अशी उमेद दिसत आहे.

गेल्या मंगळवारी दोन प्रहरचे ट्रेननें हिंदुस्थानचे कैवारी व राष्ट्रीय सभेचे जनक ए. ओ. ह्युम साहेब बहादूर यांची स्वारी नागपूर मार्गानें लाहोर येथें यंदा डिसेंबरात भरणाऱ्या राष्ट्रीय सभेचे काम करितां रवाना झाली त्यांचे येथील रेलवे स्टेशनावर स्वागत करण्या करितां फार मोठा समूह जमला होता. आपल्या प्रजेची खरी कळकळ व प्रजेचे जे दुःख सुख ते आपले दुःख सुख असे समजणाऱ्या एखाद्या राजास जसा मान व प्रेम नैसर्गिक रीतीने दाखविलें जाते त्या प्रमाणें मे० ह्युम साहेब यांचा फार मोठा मान मरातब ठेवला जाऊन त्याचे गौरव करण्यांत आले. आमच्या हितचितकांचे अशा रीतीने उतराई होणें हें आमचे ब्रीदच आहे.

आम्हांस लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं रा० रा० बापुजी रंगनाथ पेनशनर ए० अ० कमिशनर वऱ्हाड यांस गेले कार्तिकी एकादशीचे दिवशीं पंढरपूर येथें देवाज्ञा झाली. रा० बापूसाहेब हे स्वभावानें फार गंभीर असत. हे फार धार्मिष्ट व सत्यानें वागणारे असत. वेळेच्या नेमस्तपणा बद्दल त्यांचे उदाहरण ध्यानांत ठेवण्या सारखे आहे. पेनशन घेतल्या नंतर हे पंढरपूरच्या म्युनसिपाल कमेटीच्या चेअरमनचे काम फार सर्वोत्कृष्ट रीतीनें करून दाखविल्या बद्दल लोक त्यांची स्तुती करित आहेत. त्यांचे मरणा मुळें त्यांचे वऱ्हाडांतील जुन्या व नव्या मित्र मंडळांस फार वाईत वाटत आहे. परमेश्वर सत्ते पुढे काय इलाज !

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडीमुंबई दर्शनी | | | ९९।।।= |
| ,, १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९।।= |
| सुवर्ण २५।। | रुपे ९३।।। | आळशी | १०५ |
| गहू काठे ६५ | | बनशी | ८० |
| जवारी ५१ | चणे ६० | सर्की | ४।।= |
| कापूस ४२ | रुई ६० | जीनची रुई | ६० |
| मीठ ४। | तूप ७।।। | तेल | ५।= |

सट्याचे भाव.

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | वसंत १५ संवत | १९४९ | ४६।।।= |
| गहू | वैशाख शुद्ध | १९४९ | ६१०– |
| आळशी | चैत्र शुद्ध | १९४९ | ९४०– |
| रुई | फाल्गुन शुद्ध | १९४९ | ५७।।। |
| सर्की | वै. नवे साळची | [illegible]९ | • |

## वर्तमानसार

जीवो जीवस्य जीवनम्— लखनौ येथें एका तळ्यांत एक मासा धरण्यांत आला; तो सुमारें एक यार्ड लांबीचा होता. त्या माशास कापल्यावर त्याच्या पोटांत एक १६ इंच लांबीचा दुसरा मासा आढळला; व या दुसऱ्या माशाचें पोट फाडतां, त्याच्या पोटांत एक दोन फूट लांबीचा साप व एक मोठा बेडूक असे निघाले! वि. सा.

अपघात मृत्यु!— महादेव घाटे या नांवाचा तरुण मुलगा पुणें येथील गेटाकडे विहिरींत घागर पडली होती ती काढण्यास उतरला विहिरीला पाणी सहा पुरुषांवर आहे. बुडी मारून त्याणें घागर वर आणिली; आणि विहिरीवर मौज पाहण्यास उभ्या राहिलेल्या मुली व बापकांस आणखी मजा दाखविण्यासाठीं ती भरलेली घागर पुनः सोडून देऊन ती काढण्यास जी त्याणें बुडी मारली तों तो पुनः वर आला नाहीं ! पुढें गळ घालून त्याचें प्रेत वर काढलें. त्या वेळीं त्याचे डोक्यास विहिरीची कपार लागल्यामुळें जखम झालेली होती व त्या जखमेमुळेंच त्याच्यानें वर येववले नाहीं! हा मुलगा यंदा पी. ई. परीक्षेस बसला होता. दुःखांत समाधान हें कीं, त्याचें लग्न झालें नव्हतें,

ता० २० डिसेंबर बुधवारी दुपारच्या १२ वाजतां म्याट्रिक्युलेशनचा निकाल होईल.

गव्हर्नर जनरल यांनीं सिमल्याहून निघतांना जें भाषण केलें, त्यांत—गाय ही हिंदूंस पूज्य आहे त्यासाठीं त्यांच्या मनाला दुःख न वाटेल असें वर्तणें व मुसलमानांच्या धर्म पद्धतींतही हात न घालणें हें सरकारचें वर्तन आह्मी संभाळून पाळीत आहों. जे लोक—मग ते कोणीही असोत—ते जर दंगा करण्यास प्रवृत्त होतील तर त्यांस योग्य शिक्षा करण्यासही आळस केला जाणार नाहीं. वगैरे मुद्दे होते.

वर्तमानपत्रकर्त्यांची सभा— अमदाबादेस येत्या डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत गुजराथी पत्रांची सभा भरणार आहे. पत्रकर्त्यांशिवाय लोकांचाही त्यांत समावेश होणार आहे.

सयाम व फ्रेंच—फ्रेंचांनीं लाओस्थान जातीच्या कांहीं सयामी लोकांना मारून टाकल्यामुळें, फ्रेंचांच्या ताब्यांतील सयामच्या भागांत मोठा दंगा उसळला आहे. त्याला शांतविण्यास फ्रेंच लष्करास देखील कठीण पडलें आहे. इतकेंच नव्हे, तर नदेशीय लष्करांत देखील हुल्लड उठली आहे.

गोरक्षणसंबधी महत्वाचा मुद्दा — बंगालच्या लेफटनंन्ट गव्हरनरांनीं दंग्यासंबधानें माहिती मिळवून जो एकंदर ठराव बाहेर पाडला आहे, त्यांत ते आशा करतात कीं, "हिंदुस्थानच्या जनावरांची सुधारणा होण्याकरितां सरकार मार्फत कांहीं तरी इलाज करण्यांत येतील. आणि या कार्यों जर गोरक्षण सभा मदत करतील तर उभयतांच्या मदतीनें फार उत्तम काम होईल. इतकेंच नव्हे, तर यामुळें बिहार प्रातांत जें अस्वास्थ्य उत्पन्न झालें आहे तेंही मोडून जाईल.

अमेरिकेंतील प्रसिद्ध न्यूयार्क शहरापाशीं ४ रेल्वेचे फाटे, सुमारें १० मैलपर्यंत शेजारून शेजारून गेले आहेत. त्या चारी फाट्यांवर चार इंजिनें चालण्याची सोय केली असून, घोड्यांप्रमाणें त्या इंजिनांची शर्यत लौकरच होणार आहे.

ब्रह्मदेशांतील व्यापाराचा फायदा मिळावा ह्मणून, दक्षिण ते पश्चिम भागापर्यंत एक रेल्वे करण्याबद्दल विलायतेंत वाटावाट चालली आहे.

मुंबई म्युनिसिपालिटीच्या कॉर्पोरेशन स्ट्यांडिंग कमेटींत—हल्लीं असलेला धान्यावरील व लांकडावर म्युनिसिपालिटीचा कर निम्मा कमी करण्याचें ठरलें.

ठराव —मद्रास स्मालकोर्टाचें फुलबेंच नुकतेंच बसलें होतें तेव्हां त्यांनीं असा ठराव केला कीं, रिणको कोर्टांत आला असतां, त्यावेळीं त्याच्यावर डिक्रीची बजावणी करूं नये. श्री. स.

आगीची पूर्व सूचना येईल असें एक थर्मामिटर ( उष्णतामापकयंत्र ) लंडन येथें तयार केलें आहे.

मि० नार्टन आल्या बरोबर नवाब मेहेदी हसन यांच्यावर खोटी शपथ वाहिल्याबद्दल खटला सुरू होइल असें ह्मणतात.

बीन घोड्याची ट्राम्वे— सदरहू ट्राम्वेस घोडे जुंपात नाहींत, व इंजीन लावून ही ओढीत नाहींत, पण दोन रेल्वेमध्यें एक गाडा असतो त्यानें गाडी सरकत सरकत धांवते. न्या० सु०

भयंकर दरवडा— चंदीपूर येथें बाबू नारीलालदास यांचे घरावर गेल्या आठवड्यांत ३०।४० हत्यार बंद दरवडे खोरांचे टोळीनें दरवडा घालून ५ हजारांची लूट नेली. सदहूं बाबूस व त्यांचे बायकोस पैशाची पेटी दाखवीपर्यंत दरवडेखोर मारीत होते असें समजतें.

फतेमार बुडाली— भिवंडी येथून ४ हजार रुपयांचे तांदूळ भरलेली एक फतेमार मुंबईस जात असतां मजगांवच्या गोदीजवळ बुडाली.

√दंग्याचे परिणाम—अझमगड जिल्ह्यांतील दंग्यांत झालेल्या एकंदर प्रकारानें हिंदु लोक फार कष्टी व विपद्ग्रस्त होऊन गेलेले आहेत. तेथील हिंदु शेतकरी लाचार झाल्यामुळें गळ्यांत नागर बांधून तीस तीस चाळीस चाळीस असामीचे मेळे करून हल्लीं भीक मागत फिरत आहेत!! हिंदुवर झालेल्या जुलमामुळें कित्येक लोकांनीं रामलीलेचा उत्सव यंदा केला नाहीं. अझमगडचे कलेक्टर मऊ येथें पोलिस स्वार वगैरे घेऊन गेले होते, व दोघां पुढारी हिंदूंस रामलीलोत्सव करा असें सांगत होते! परंतु त्यांणीं निक्षून सांगितलें कीं, आमचे पुढारी तुरुंगांत अडकवून टाकलेले आहेत, ते आमच्यांत नाहींत, तर आमच्या हातून आनंदोत्सव व्हावयाचा नाहीं. हिंदु लोकांचा असंतोष घालवून त्यांचें लक्ष खेळाकडे लागावें ह्मणून कलेक्टरांनीं पोलीस स्वारांकडून कुस्त्या व शर्यती वगैरे तेथें करविल्या; परंतु त्यांच्याकडेही हिंदूचें मन लागलें नाहीं. ४ हजार मुसलमानांस २ हिंदु या प्रमाणानें क्वचित हिंदुलोक त्या शर्यती पाहण्यास आले होते, असें लखनौ ॲडव्होकेट वरून समजतें. मनाची प्रसन्नता नाहीं, तर जुलमाच्या रामरामानें काय होणार?

पाच लाखांची रांगोळी—पेशावर येथील कमिसारिएट खात्याच्या वखारीस आग लागून ५ लाख रुपयांचे मालाची रांगोळी झाली! आग लाव्याचें हें कृत्य असावें असें ह्मणतात.

काबुलांत गेलेलें इंग्रज सरकारचें वकील मंडळ ता० १४ रोजीं हिंदुस्थानांत येण्यास परत निघालें. ता० १२ रोजीं अमिरानें सैन्याची परेड करून दाखविली व त्यावेळीं आपल्या लढवय्यांस असें बोलून दाखविलें कीं, सरहद्दीचे संबंधानें आपला व इंग्रज सरकारचा समेट झाला, व उभयतांचा मित्रभाव आतां कायमचा स्थापीत झाला.

कायद्याचा महत्वाचा प्रश्न — जज्जानें आपल्या अधिकारा बाहेर केलेल्या कामाबद्दल त्याजवर नुकसानीचा दावा घालणें योग्य आहे कीं नाहीं? असा एक वादग्रस्त प्रश्न विलायतेंतील क्वुइन्स बेंचाडिव्हिजन कोर्टापुढें निकालासाठीं आला आहे. स. शो.

म्याट्रिक्युलेशन परिक्षेस ३,००० उमेदवार असून त्यांत ६७ मुली आहेत.

इतर सर्व राष्ट्रें आपलें अरमार वाढवीत आहेत, अशा स्थितींत इंग्लंडानें आपल्या आरमारा बदल जर खबरदारी घेतली नाहीं तर येत्या वर्षी अडवण पडेल असें लार्ड हामिल्टण यांचे ह्मणणें आहे.

फ्रान्स व रशिया याचें अरमार फार मोठें आहे करतां आपलें ही तसें करणें अवश्य आहे मग त्या करतां दोहा कोट रुपये खर्च झाले तरी हरकत नाहीं असें टाइम्स पत्र इंग्लंडास सूचना करीत आहे

मेकांगचा एक रस्ता करण्याचें बंद करा असा केलेला हुकूम रस्ता करणाऱ्यानीं अमान्य केल्यामुळें त्यांतील कित्येकांस फ्रेंचांनीं गोळ्या घालून ठार केलें व या वरून तिकडील डोंगरी लोक फार चवताळले आहेत व टाकीन प्रांतांतले सर्व लोक बंडावा करण्यास उद्यत झाले आहेत व त्यांस धाकांत ठेवण्यास फ्रेंचफौज असमर्थ आहे, फ्रेंचांच्या फौजेंत जे नेटिव शिपायी आहेत तेहे बिथरल्यासारखे झाले आहेत. नेटिव लष्करी लोक बिथरले तर परकीय राजसत्ता कायम राहाणें कठीणच आहे.

ब्राझिल लोकांनी पुन्हा दंगा सुरू करून शहरावर तोफांचा भडिमार सुरू केला आहे. शहरांतल्या ब्यांका बंद असून बंदरांतली परकीय लढाऊ गलबतें व्यापारी गलबतांचें रक्षण करीत आहेत.

इग्लंड ब्यांकेस नुकतेंच जे नुकसान लागलें त्या मुळें त्या ब्यांकेबद्दल वाईट वाईट गप्पा उठल्या आहेत. टा० अ०

शरीराच्या प्रमाणानें पाहिलें असतां सर्व चतुष्पाद प्राण्यांमध्यें घोड्याचा कोठा फार लहान असतो.

फक्त लंडन शहरात धुराडीं झाडून साफ करणारे लोक ५।६ हजार आहेत. इतके लोक ८ लक्ष घरांमिळून १,००,००,००० धुराडी झाडतात.

एका पियानो ( बाजाचें वाद्य ) मध्यें एक मैल तार असते.

"मी अधिक श्रीमंत, तेव्हां मी बाकीच्याहून फार चांगला. मी मोठा वक्ता ह्मणून मी सगळ्याहून श्रेष्ठ." असें ह्मणणें अगदीं खोटें. "मी श्रीमंत तेव्हां माझी संपति बाकीच्या संपतिपेक्षां श्रेष्ठ. मी मोठा वक्ता तेव्हां माझी वाणी सगळ्यापेक्षां श्रेष्ठ" असे ह्मणणें शोभेल तरी मनुष्य स्वतः ह्मणजे त्याची संपति नव्हे किंवा त्याची वाणीही नव्हे. तो चांगला होण्यास निराळ्याच गोष्टी श्रेष्ठ असाव्या लागतात. कर्म.

नोटीस.

ती. रा. रा. राघोजी वल्लद राणोजी तेली राहणार सिंदखेड ता. मेहकर जि. बुलढाणें यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही आमचे सखे वडील बंधू आहांत व आपल्या स्थावर जंगम जिनगींत हिशे व्हावेत ते आजपर्यंत झाले नाहींत. पुष्कळ वेळां तुम्हांस हिशेब करून टाकण्या करितां समक्ष म्हटले व टपाल मार्गे सन १८८९ च्या फेब्रुआरी महिन्यांत नोटीस ही दिली होती त्याही नोटीस तुम्ही ऐकिले नाहीं. या वरून तुमच्या मनांत उघड बेमानी दिसते. करितां हल्लीं वर्तमान पत्रांत नोटीस देणें भाग पडलें हल्लीं तुम्हांस हीच विनंती आहे कीं तुमच्या व आमच्या हातानें जिनगीचे निमे निमे हिशे व्हावेत म्हणजे पुढें तुमचे व आमचे मुलांत तंटे होणार नाहींत. करितां नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत स्थावर जंगम जिनगीचे हिशे करून देऊन आमची पावती द्यावी. असे न केल्यास रिती प्रमाणें तुमचे वर काम चालवून अखेर पर्यंत जो खर्च लागेल तो व या नोटिशीचे खर्चा सुद्धां सर्व नुकसान भरून घेऊ कळावें ही विनंती ता० १५।११। ९३ इ०

( सही. )
लक्ष्मण वल्लद राणोजी तेली राहणार
अंजनी खुर्द द० यमाजी
लक्ष्मण तेली.

नोटीस,

नोटीस बेशमी हरीचंद वा॥ रावजी काळे देशमुख राहाणार सांगळुद अंबाबाईचे तालुके व जिल्हे अकोला व हनंवतराव वा॥ रामराव देशमुख राहणार दर्यापूर यानां खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी व माझी वडील बहीण नामे चंद्रभागा जवजे पुनाजी असे दोघींनीं तुह्मा दोघास कुलमुकत्यारपत्र दिलें होते परंतु हल्ली माझी बहीण चंद्रभागा ही मैयत झाली तिजला वारस मजाशिवाय दुसरें कोणी नाहीं व तुमशी मशी आपसांत जमत नसल्यामुळें मी तुह्मास दिलेलें मुकत्यारपत्र रद्द केलें आहे आतां तुह्मी आमचे कोणतेही कामांत हात घालूं नये घातल्यास त्याजबद्दल जबाबदार मी राहणार नाहीं म्हणून ही नोटीस दिली सही ता १८ माहे नवेंबर सन १८९३ इ०

सही.
नि॥ रंगुबाई जवजे पूंजाजी देशमुख
राहणार वरुड बाजारचे निशाणी बां.
गडी असे गुमास्ते नागोराव
करणाजी देखमुख
दस्तूर खुद.

## जाहिरात.

जाहिरनामा सर्वत्र लोकांस कळावें कीं खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं आह्मी हरीचंद वा॥ रावजी काळे राहणार सांगळुद अंबाबाईचें हनवंत रामराव देशमुख राहणार दर्यापुर या उभयतांस कुलमुकत्यारमत्र दिलें असून हल्लीं त्याशीं मशीं चांगलें जमत नसल्यामुळें मीं यांचे मुकत्यारपत्र रद्द केलें आहे व वरील उभयतां इसमांस माझें नांवावर व माझी बहीण चंद्रभागा ही मैयत झाली इचे नांवावर कोणी या दोघांस कर्ज वगैरे देऊन रोखा वगैरे घेतल्यास आह्मी सदरहु इसमांनीं घेतलेल्या पैशाचे मालक राहणार नाहीं. ज्याचे ते जबाबदार होतील.

( सही )
नि॥ रंगुबाई जवजे पुंजाजी देशमुख
राहणार वरुड बाजारचे निशाणी
बांगडी असें. गुमास्ते नागोराव कर्णाजी देशमुख
दस्तुर खुद.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.